सेवा सुविधा सुरक्षा

# महेश सहकारी बँक लि.,पुणे

भूखंड क्र. ३७२/७३/७४, मार्केटयार्ड, महेश बँक बिल्डिंग, गुलटेकडी, पुणे-४११०३७

☎ ०२० - २४२६३३४१ /४२ /४३ Fax - ०२० - ६६०२३६५४

E-mail : maheshbank@vsnl.net Website : www.maheshbankpune.in

# पोटनियम

(दिनांक २०.०४.२०१३ रोजी झालेल्या विशेष सर्व साधारण सभेने स्वीकृत करुन मान्यता दिलेल्या व मा. सहकार आयुक्त यांचेकडे मंजूरीसाठी दाखल केलेले पोटनियमाची प्रत)

नोंदणी क्र./ पी.एन.अे. / बी.एन.के. / २०३ / ०७.०९.१९७२
भारतीय रिझर्व्ह बँक / परवाना क्र. / अे.सी.डी.एम.एच.१८३ पी / १८.०२.१९८०

# महेश सहकारी बँक लि.,पुणे

मुख्यकार्यालय: ३७२/७३/७४, श्री छत्रपती शिवाजी मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-४११ ०३७.

**दूरध्वनी क्रमांक : २४२६३३४१/४२/४३** **फॅक्स: (०२०) ६६०२३६५४**

**Website: www.maheshbankpune.in** **E-mail: maheshbank@vsnl.net**

# पोटनियम संदर्भ सूची



| पोटनियम क्र. | तपशील | पान क्र |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | १ |
| २ | नोंदणीकृत कार्यालय | १ |
| ३ | बँकेचे कार्यक्षेत्र | १ |
| ४ | व्याख्या | १ |
| ५ | उद्‌देश | ४ |
| ६ | निधी | ६ |
| ७ | कर्जे उभारण्याची मर्यादा | ७ |
| ८ | भाग भांडवल | ७ |
| ९ | सभासदत्व | ७ |
| १० | सामान्य सभासद | ७ |
| ११ | सामान्य सभासदत्वासाठी अटी | ८ |
| १२ | सभासदाचे हक्क व अधिकार | ९ |
| १३ | सभासदत्वाचा अर्ज व त्याबाबतचीकार्यवाही | ९ |
| १४ | क्रियाशील सभासद | १० |
| १५ | क्रियाशील सभासद होण्यासाठी किमान अटी | १० |
| १६ | क्रियाशील सभासदांचे अधिकार | १० |
| १७ | बँकेच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्याचा अधिकार | ११ |
| १८ | सहयोगी सभासदत्व : अधिकार व जबाबदाऱ्या | ११ |
| १९ | नाममात्र सभासद | १२ |
| २० | सभासदांची जबाबदारी | १२ |

| पोटनियम क्र. | तपशील | पान क्र |
|---|---|---|
| २१ | सभासदांची ओळख | १२ |
| २२ | सभासदत्वाचा राजीनामा देणे | १३ |
| २३ | सभासदत्वाचे निष्कासन करणे | १३ |
| २४ | सभासदत्व संपुष्टात येणे | १४ |
| २५ | भागदाखला | १४ |
| २६ | नामांकन | १५ |
| २७ | सभासदाचा मृत्यू | १५ |
| २८ | माजी सभासदांची जबाबदारी व मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता | १५ |
| २९ | सभासदांचे भाग भांडवल, लाभांश व ठेवींवरील बँकेचाहक्क | १५ |
| ३० | भाग वर्ग अथवा भाग रक्कम अशंत: परत करणेबाबत | १६ |
| ३१ | सर्वसाधारण सभा | १६ |
| ३२ | सर्वसाधारण सभेची कामे व अधिकार | १६ |
| ३३ | विशेष सर्वसाधारण सभा | १७ |
| ३४ | वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेची सूचना | १७ |
| ३५ | वार्षिक सर्वसाधारण व विशेष सर्वसाधारण सभेची गणपूर्ती | १८ |
| ३६ | सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष | १९ |
| ३७ | ठराव | १९ |
| ३८ | सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त | १९ |
| ३९ | संचालक मंडळ | १९ |
| ४० | संचालक म्हणून निवडणुक लढविण्यास पात्रता | २० |
| ४१ | अध्यक्ष व उपाध्यक्ष | २१ |
| ४२ | अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे अधिकार व कामे | २१ |
| ४३ | संचालक मंडळाचे इतिवृत्त | २२ |
| ४४ | संचालक मंडळाचे अधिकार व कार्ये | २२ |
| ४५ | संचालकपदासाठी अपात्र होणे | २३ |
| ४६ | संचालक मंडळ सभांसाठी गणपूर्ती | २४ |

| पोटनियम क्र. | तपशील | पान क्र |
|---|---|---|
| ४७ | संचालक मंडळावरील रिक्त जागा | २४ |
| ४८ | संचालक मंडळ सभा | २५ |
| ४९ | संचालक मंडळाच्या उपसमित्या | २५ |
| ५० | तक्रार निवारण व तडजोड समिती | २५ |
| ५१ | मुख्य कार्यकारी अधिकारी, त्यांचे अधिकार व त्यांचीकर्तव्ये | २६ |
| ५२ | ठेवी | २७ |
| ५३ | कर्ज व्यवहार | २८ |
| ५४ | बँकिंगव्यतिरिक्त होणाऱ्या जास्तीत जास्त खर्चाची मर्यादा | २९ |
| ५५ | नफ्याची वाटणी | २९ |
| ५६ | भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण | ३० |
| ५७ | निधीची गुंतवणूक | ३० |
| ५८ | राखीव निधी | ३१ |
| ५९ | लाभांश | ३१ |
| ६० | हिशोब, नोंदी व लेखापरीक्षण | ३१ |
| ६१ | बँकेची मोहर (सील) | ३२ |
| ६२ | पोटनियमाची दुरुस्ती | ३२ |
| ६३ | सभासदांसाठी शैक्षणिक वर्ग | ३२ |
| ६४ | भविष्यनिर्वाह निधी | ३३ |
| ६५ | सेवाशर्ती | ३३ |
| ६६ | समारोप करणे | ३३ |
| ६७ | व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेत कर्मचा-यांचा सहभाग | ३३ |
| ६८ | इतर | ३३ |

# पोटनियम

## १) संस्थेचे नाव :

बँकेचे नाव महेश सहकारी बँक लि.,पुणे असे राहील आणि सदर संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नोंदणी क्र.पी.एन.अे. /बी.एन.के. /२०३ दिनांक ०७.०९.१९७२ अन्वये झाली असून रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मार्फत बँकेस बँकिंग व्यवहार करण्याचा परवाना क्र. अे.सी.डी.एम.एच.१८३ पी दिनांक १८.०२.१९८० नुसार मिळाला आहे.

## २) नोंदणीकृत कार्यालय :

(१) बँकेचे मुख्य व नोंदणीकृत कार्यालय भूखंड क्र. ३७२/७३/७४, मार्केटयार्ड, महेश बँक बिल्डिंग, गुलटेकडी, पुणे-४११०३७ या पत्त्यावर असेल.

(२) वरील पत्त्यामध्ये कोणताही बदल करावयाचा झाल्यास सदर पोटनियमाची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये दिलेल्या पद्धतीनुसार दुरुस्ती करावी लागेल व त्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.

## ३) बँकेचे कार्यक्षेत्र :

बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सीमांपर्यंत मर्यादित राहील. यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नोंदणी अधिकारी यांची लेखी पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

## ४) व्याख्या :

(१) 'कायदा' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या होय.

(२) 'नियम' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्त्या होय.

(३) 'निबंधक' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतुदीनुसार नेमण्यात आलेल्या सहकारी संस्थांचा निबंधक ही व्यक्ती होय.

(४) 'पोटनियम' म्हणजे बँकेचे सध्या अस्तित्वात असलेले व कायद्यानुसार नोंदणी करण्यात आलेले अथवा करण्यात येणारे पोटनियम व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या अथवा करण्यात येणाऱ्या दुरुस्त्या होय.

(५) ‘जनरल बॉडी’ म्हणजे बँकेचे सर्वसामान्य सभासद होय. (हयामध्ये सर्व क्रियाशील व अक्रियाशील सभासदांचा समावेश असेल.)

(६) ‘बोर्ड’ म्हणजे बँकेचे संचालक मंडळ होय.

(७) ‘सर्वसाधारण सभा’ म्हणजे मतदानाचा हक्क असलेल्या सर्व सभासदांची सभा. यामध्ये विशेष सर्वसाधारण सभेचाही समावेश होईल.

(८) ‘मुख्य कार्यकारी अधिकारी’ म्हणजे बँकेतील सर्वोच्च कार्यकारी अधिकारी होय. सदर अधिकाऱ्यास इतर कोणत्याही नावाने उदा. सरव्यवस्थापक, कार्यकारी संचालक असे संबोधले तरी त्यास मुख्य कार्यकारी अधिकारी असे समजण्यात यावे. असा अधिकारी हा बँकेच्या संचालक मंडळाचा पदसिद्ध सदस्य असेल.

(९) ‘व्यक्ती’ म्हणजे कोणताही प्रौढ व्यक्ती जी इंडियन कॉंट्रॅक्ट ॲक्ट १८७२ च्या कलम ११ नुसार करार करू शकते, स्वतःच्या मालकीची मालकी संस्था असलेली व्यक्ती, भारतीय भागीदारी कायदा १९३२ अन्वये नोंदलेली भागीदारी संस्था, अविभक्त हिंदू कुटुंब, प्रचलित कायद्यानुसार अथवा दुरुस्तीनुसार नोंदणी करण्यात आलेली कोणतीही कंपनी अथवा संस्था, राज्य सरकार, सार्वजनिक विश्‍वस्त संस्था किंवा इतर कोणत्याही संस्था होय.

(१०) ‘कुटुंबीय’ म्हणजे पत्नी, पती, वडील, आई, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, जावई किंवा सून असे होय.

(११) ‘पदाधिकारी’ म्हणजे संचालक मंडळाने निवडलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष, नेमणूक करण्यात आलेले मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक सदस्य, अवसायक, प्रशासक व अन्य अशी कोणतीही व्यक्ती जिची नियुक्ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत व बँकेच्या आदर्श पोटनियमानुसार बँकेचा व्यवसाय चालविण्यासाठी आदेश/मंजुरी देणारी व्यक्ती.

(१२) ‘सामान्य सभासद’ म्हणजे बँकेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणीनंतर कायदा, नियम व पोटनियमानुसार ज्यांचे सभासदत्व स्वीकारण्यात आलेले आहे, अशी व्यक्ती.

(१३) ‘नाममात्र सभासद’ म्हणजे सदर पोटनियमातील तरतुदीनुसार ज्या व्यक्तीचे सभासदत्व स्वीकारले आहे, अशी व्यक्ती.

(१४) ‘क्रियाशील सभासद’ म्हणजे बँकेच्या व्यवसायामध्ये सदर पोटनियमातील तरतुदीनुसार ज्यांचे हितसंबंध आहेत, अशी व्यक्ती.

(१५) ‘सहयोगी सभासद’ म्हणजे दुस-या सभासदाबरोबर बँकेचे भाग धारण केलेली व्यक्ती. पण अशा व्यक्तीचे नाव भाग प्रमाणापत्रावर पहिले असणार नाही.

(१६) 'सहकारी संस्था' म्हणजे महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेली संस्था.

(१७) 'फेडरल सहकारी संस्था' म्हणजे सहकार कायद्यांअंतर्गत नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांचे फेडरेशन/असोसिएशन. सदर फेडरेशन/ असोसिएशनचे सभासदत्व बँकिंग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांनाच मिळू शकेल.

(१८) 'सहकारी बँक' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेली अथवा नोंदणी करावयाची सहकारी संस्था. अशा संस्थेला बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ अन्वये लायसेन्स प्रदान करण्यात आले आहे किंवा प्रदान करण्यात येणार आहे.

(१९) 'रिझर्व्ह बँक' म्हणजे आर.बी.आय. ॲक्ट १९३४ नुसार निर्माण करण्यात आलेली भारतीय रिझर्व्ह बँक.

(२०) 'ठेव विमा महामंडळ' म्हणजे ठेव विमा महामंडळ कायदा १९६१ च्या कलम ३ नुसार स्थापन करण्यात आलेले ठेव विमा व पत हमी महामंडळ होय.

(२१) 'डिफॉल्टर' म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७३ सी.ए. नुसार थकबाकी करणारी व्यक्ती.

(२२) 'विलफुल डिफॉल्टर' म्हणजे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या विविध आदेशांचे व मार्गदर्शक तत्त्वांचे हेतुपुरस्सर उल्लंघन करणारा थकबाकीदार सभासद होय.

(२३) 'सहकार वर्ष' म्हणजे दि. ०१ एप्रिल ते ३१ मार्चमधील कालावधी.

(२४) 'कार्यक्षेत्र' म्हणजे पोटनियम क्र.३ नुसार ज्या क्षेत्रामधील व्यक्तींना बँकेचे सभासद म्हणून स्वीकारण्यात येते, असे क्षेत्र.

(२५) 'सहकारी तत्त्वे' म्हणजे १९९५ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी असोसिएशन यांनी तयार करून आजतागायत वेळोवेळी सुधारणा केलेली सहकाराची तत्त्वे होय.

(२६) 'राज्य सरकार' म्हणजे महाराष्ट्र राज्याचे सरकार होय.

(२७) 'कर्मचारी' म्हणजे बँकेच्या सेवेमध्ये कार्यरत असलेली व बँकेशी करारान्वये नोकरीत असलेली व्यक्ती.

(२८) 'नोटिफिकेशन' म्हणजे केंद्र व राज्य सरकारच्या अधिकृत गॅझेटमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले नोटिफिकेशन.

(२९) बँक म्हणजे महेश सहकारी बँक लि., पुणे

(३०) 'बी.आर.ॲक्ट' म्हणजे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९.

(३१) 'कार्यलक्ष्यी संचालक' म्हणजे कार्यकारी संचालक अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा कोणत्याही अशा पदावर असणारी व्यक्ती जी संचालक मंडळाने मुख्य अधिकारी म्हणून नेमली आहे.

**५) उद्देश :**

बँकेचा मुख्य उद्देश ठेवीदारांचे हित जपणे हा असून सभासदांमध्ये सामाजिक व आर्थिक प्रगती साधणे आणि सदर प्रगती सहकाराच्या तत्त्वानुसार स्वत:साठी व एकमेकांसाठी एकमेकांच्या मदतीद्वारे साधणे.

(१) सभासदांमध्ये काटकसर, स्वावलंबन व सहकार्याची भावना वृद्धिंगत करणे.

(२) जनतेकडून ठेवी स्वीकारणे, त्यांचा विनियोग कर्ज देणे अथवा गुंतवणूक करणे, तसेच स्वीकारलेल्या ठेवी मागणी करताच चेक, डिमांड ड्राफ्ट अथवा इतर कोणत्याही मार्गाने परत करणे.

(३) कर्ज अथवा पैशाची उभारणी करणे.

(४) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया/निबंधकांच्या परवानगीनुसार सभासदांना अथवा नाममात्र सभासदांना तारण घेऊन अथवा तारणाशिवाय कर्ज अथवा उचल देणे.

(५) हस्तांतरणास, वर्ग करण्यास योग्य असणाऱ्या हुंड्या देणे, स्वीकारणे, खरेदी करणे, विकणे अथवा डिस्काऊंट करणे, वचनचिठ्ठ्या, ड्राफ्ट्स, कूपन्स, रेल्वे रसिदा, हमी पत्रे, दाखले, वॉरंट्स, शेअर्स, डिबेंचर्स व इतर सुरक्षा पत्रे काढणे, विकत घेणे, विकणे, स्वीकारणे, डिस्काऊंट करणे, वसूल करणे इत्यादी व्यवहार करणे.

(६) हमीपत्रे (लेटर ऑफ क्रेडिट), प्रवासी चेक (ट्रॅव्हलर्स चेक) व सर्क्युलर नोट्स देणे व मंजूर करणे.

(७) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने विदेशी बँक चलन विकत घेणे, विदेशी चलनाचे सर्व व्यवहार करणे; तसेच सोने, चांदी लगड अथवा इतर स्वरूपात खरेदी करणे अथवा विकणे.

(८) सर्व प्रकारच्या गुंतवणुकी, स्टॉक्स्, शेअर्स, कर्जरोखे, बाँड्स, वचनचिठ्ठ्या, करारनामे, सिक्युरिटीज् स्वीकारणे, ताब्यात ठेवणे व यासंबंधीचे कमिशन, अंडररायटिंग आदी व्यवहार करणे.

(९) ग्राहकांच्या वतीने बाँड्स, कर्जरोखे, वचनचिठ्ठ्या व इतर सर्व प्रकारचे दस्तऐवज (सिक्युरिटीज्) विकत घेणे व विकणे.

(१०) सर्व प्रकारचे बॉण्ड्स, कर्जरोखे, वचनचिठ्ठ्या व इतर प्रकारच्या मौल्यवान वस्तू ठेवीच्या स्वरूपात अथवा सुरक्षित तिजोरीत ठेवण्यासाठी स्वीकारणे.

(११) सुरक्षित तिजोरी घर (सेफ डिपॉझिट व्हॉल्ट) व तदनुषंगिक सेवा उपलब्ध करून देणे.

(१२) सुरक्षापत्रे व रोख रकमांची देवाण-घेवाण करणे, पाठविणे.

(१३) कर्ज व उचलीचे व्यवहार/बोलणी करणे.

(१४) ग्राहकांच्या वतीने हमीपत्र (गॅरंटी), नुकसानभरपाई (इंडेम्निटी) व्यवहार करणे.

(१५) राज्य सरकार, नगरपालिका, सहकारी व इतर संस्था, कॉर्पोरेशन्स, संघटना यांचे शेअर्स, कर्जरोखे, कर्ज, स्टॉक संबंधीचे विमा, हमी, व्यवस्थापन सहभाग इत्यादींबाबतचे कर्ज व्यवहार करणे.

(१६) बँकेच्या हिताच्या व उपयुक्ततेच्या दृष्टीने वास्तू संपादन करणे, बांधणे, तिची देखभाल करणे, वास्तूमध्ये बदल करणे अथवा रूपांतर करणे.

(१७) बँकेच्या पूर्ण अथवा अंशत: येण्यापोटी ताब्यात असलेल्या मालमत्तेची व्यवस्था करणे, विकणे अथवा अन्य तऱ्हेने विल्हेवाट लावणे.

(१८) संचालक, सभासद व कर्मचारी यांना सहकार व बँकिंग या विषयावर प्रशिक्षण देणे.

(१९) सहकार खाते व रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये जनतेला बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शाखा, विस्तारित कक्ष, ए.टी.एम. अथवा उपकार्यालय उघडणे.

(२०) सहकार खाते व रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने इतर कोणत्याही सहकारी संस्थेचा कारभार पूर्णपणे अथवा अंशत: ताब्यात घेणे अथवा व्यवस्थापन करण्यासाठी घेणे.

(२१) सभासदांच्या, बँकेच्या आजी व माजी कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पूरक अशा संघटना, संस्था, निधी, विश्वस्त निधी स्थापन करणे, स्थापन करण्यास मदत करणे अथवा त्यामध्ये सहभागी होणे. तसेच बँकेचे आजी वा माजी कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या किंवा संबंधित व्यक्तीस पेन्शन मंजूर करणे, विमा उतरविणे, धर्मादाय व परोपकार करण्याच्या उद्देशाने कार्यरत असणाऱ्या सार्वजनिक संस्थांना हमी देणे, वर्गणी देणे अथवा त्यांचे व्यवस्थापन पहाणे, ट्रस्टी म्हणून काम करणे.

(२२) सभासदांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी विविध योजना करून कर्जपुरवठा करणे.

(२३) लघु व कुटीर उद्योगधंद्यांना अर्थपुरवठा व तंत्रज्ञान उपलब्ध करणे, स्वयंरोजगारी उद्योजकांना स्वत:चा उद्योगधंदा उभा करण्यास मदत करणे.

(२४) जेथे आवश्यक असेल तेथे रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने व इतर बँका अथवा संस्था यांच्या सहभाग कर्ज योजनेत भाग घेऊन गरजूंना कर्जपुरवठा करणे.

(२५) बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट १९४९ चे कलम ६(१) नुसार इतर सर्व व्यवहार करणे.

(२६) विविध शासकीय संस्था, निमशासकीय संस्था व कायद्याच्या तरतुदीने अस्तित्वात येणाऱ्या संस्था इत्यादींसाठी अधिकृत प्रतिनिधी संस्था म्हणून निधी जमा करण्याचे काम करणे.

(२७) महाराष्ट्र को–ऑप. हाउसिंग फायनान्स सोसायटी, आयुर्विमा महामंडळ, सरकारी/निमसरकारी व इतर आर्थिक संस्था यांच्याकडून पुनर्वित्त प्राप्त होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपाचा अथवा कायम

स्वरूपाचा कर्जपुरवठा सहकारी गृहनिर्माण संस्थांना निबंधक व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या पूर्वपरवानगीने करणे.

(२८) राज्य सरकारने सुचविल्यानुसार इतर कोणत्याही स्वरूपाचा व्यवसाय जो सहकारी बँका कायदेशीरपणे करू शकतात, असा व्यवसाय करणे.

(२९) बँकेचे सभासद, ठेवीदार, ग्राहक, सार्वजनिक संस्था, इतर बँका व संलग्न संस्था यांना संगणक प्रणालीच्या आधारे आर्थिक, तांत्रिक / कायदेशीर व तद्नुषंगिक सेवा पुरविणे.

(३०) विमा कंपन्यांबरोबर करार करून कॉर्पोरेट/रेफ्रल पद्धतीनुसार विमा व्यवसाय अंगीकारणे.

(३१) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने कोणत्याही प्रचलित कायद्यानुसार एक अथवा एकापेक्षा जास्त संलग्न संस्था उभारण्यासाठी प्रवर्तक म्हणून काम करणे.

(३२) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने क्रेडिट/डेबिट कार्ड व्यवसाय सुरू करणे.

(३३) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने मर्चंट बँकिंग अथवा डिपॉझिटरी सेवा, डीमॅट सेवा पुरविणे.

(३४) निबंधक व रिझर्व्ह बँक यांच्या परवानगीने समान उद्दिष्टे असलेल्या सहकारी बँकांचे विलीनीकरण करून घेणे, व्यवस्थापन पाहणे, ताब्यात घेणे.

(३५) बँकेच्या उद्देशास अनुसरून व बँकेच्या वाढीस उत्तेजक अशा व्यवसायांपैकी आवश्यक असेल तो व्यवसाय करणे.

(३६) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार इतर कोणत्याही स्वरूपाचा व्यवसाय करणे.

## ६) निधी :

(अ) खालील साधनांनी निधी उभारता येतील.

(१) कोणत्याही प्रकारचे भाग भांडवल.

(२) प्रवेश फी

(३) वर्गणी

(४) ठेवी

(५) कर्जे, कॅश क्रेडिट, ओव्हरड्राफ्ट व उचल

(६) देणग्या, अनुदान व मदत

(७) नफा

(८) देशाबाहेरील व्यावसायिक कर्जे (ई.सी.बी.)

(९) फ्लोटिंग तारणी/विनातारणी बॉण्ड्स

(१०) पुनर्वित्त, हमीपत्रे (लेटर ऑफ क्रेडिट)

(११) नॉन कन्व्हर्टिबल डिबेंचर्स अथवा रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार इतर कोणतीही साधने.

(१२) निबंधक व रिझर्व्ह बँक यांच्या परवानगीने वेळोवेळी उपलब्ध होणारी इतर साधने.

(ब) बँकेने ठरविलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी बँकेने उभारलेले निधी वापरण्यात येतील.

## ७) कर्जे उभारण्याची मर्यादा :

कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा कायदा, नियम यानुसार नियंत्रित राहील व निबंधक यांच्या परवानगीनुसार राहील.

## ८) भाग भांडवल :

बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु. २५,००,००,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस कोटी फक्त) इतके असून ते रु.२५/- दर्शनी किमतीच्या १,००,००,००० इतक्या भागांत विभागलेले आहेत.

## ९) सभासदत्व :

बँकेमध्ये पुढील प्रकारचे सभासद असतील.

(१) सामान्य सभासद
- अ) क्रियाशील सभासद
- ब) अक्रियाशील सभासद

(२) नाममात्र सभासद

(३) सहयोगी सभासद

## १०) सामान्य सभासद :

(१) बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणारी अथवा व्यवसाय करणारी आणि त्याचे बँकेकडे कोणत्याही प्रकारच्या खात्यात कमीत कमी रु. ५००.०० जमा बाकीसह असावेत व ज्या व्यक्तीला बँकेच्या सेवांची गरज आहे व ती गरज बँक पुरवू शकत असेल व त्या व्यक्तीचा व्यवसाय बँकेच्या व्यवसायाशी समांतर अथवा संघर्ष निर्माण करणारा नसेल, तर अशा व्यक्तीस सामान्य सभासद म्हणून स्वीकारले जाईल.

(२) बँकेचे सामान्य सभासद म्हणून खालील दिलेल्या यादीव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस सभासद म्हणून स्वीकारले जाणार नाही.

(अ) सज्ञान असलेली व इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट १८७२ च्या कलम ११ नुसार करार करण्यास पात्र असलेली व्यक्ती.

(ब) स्वतःच्या मालकीच्या संस्था असलेल्या व्यक्ती.

(क) भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार नोंदणी झालेली भागीदारी संस्था.

(ड) अविभक्त हिंदू कुटुंब.

(इ) कंपनी कायद्यानुसार नोंदविलेली कंपनी अथवा अन्य प्रचलित कायद्यानुसार नोंदविलेली संस्था.

(ई) स्थानिक स्वराज्य संस्था (लोकल ऑथॉरिटी)

(फ) विश्वस्त संस्थांसाठी प्रचलित असलेल्या कायद्यानुसार नोंदविलेली विश्वस्त संस्था.

(ग) मा. निबंधक यांनी संस्थेची वैशिष्ट्ये व कार्ये यांचा विचार करून परवानगी दिलेला कोणताही व्यक्तींचा समूह.

(ह) राज्य/केंद्र सरकार.

(३) बँकेचा कोणताही कर्मचारी सामान्य सभासदत्वास पात्र असणार नाही. सध्या जे कर्मचारी सभासद आहेत, त्यांचे सभासदत्व त्वरित संपुष्टात येईल.

(४) अन्य कोणतीही सहकारी संस्था बँकेची सामान्य सभासद होण्यास पात्र असणार नाही.

**११) सामान्य सभासदत्वासाठी अटी :**

(१) खालील अटी पूर्ण करणाऱ्या अर्जदारास सामान्य सभासद म्हणून स्वीकारण्यात येईल. जर त्याने –

(अ) विहीत नमुन्यामध्ये लिखित स्वरूपात अर्ज केला असेल.

(ब) प्रवेशशुल्कापोटी रू.१००/– अथवा संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल तितक्या रक्कमेचा भरणा केला असेल व किमान साठ भागांची रक्कम भरली असेल.

(क) कायदा, नियम व बँकेचे पोटनियम यांनुसार सर्व अटींची पूर्तता केली असेल.

(२) मा. संचालक मंडळ सभेमध्ये त्याचा अर्ज मंजूर होऊन त्यास सभासद म्हणून स्वीकारण्यास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

(३) जर कोणत्याही व्यक्तीने खालील अटींची पूर्तता केली नसेल, तर तो सभासदत्व सभासद म्हणून स्वीकारण्यास अपात्र होईल.

(अ) वयाची १८ वर्षे पूर्ण केली नसतील, अशी व्यक्ती.

(ब) अधिकृत न्यायालयाने दिवाळखोर अथवा दोषमुक्त न केलेला दिवाळखोर ठरविली असेल, अशी व्यक्ती.

(क) कोणत्याही गुन्ह्यासाठी शिक्षा झाली असेल, अशी व्यक्ती. अशा गुन्ह्यांमध्ये राजकीय स्वरूपाचे गुन्हे सोडून इतर गुन्ह्यांचा समावेश असेल आणि शिक्षा होऊन ५ वर्षांचा कालावधी लोटला नसेल.

## १२) सभासदाचे हक्क व अधिकार :

प्रत्येक सामान्य सभासदांना पुढील हक्क प्राप्त होतील.

(१) सभासदास कायदा, नियम व पोटनियम यांनुसार लागू असलेले सर्व हक्क राहतील. परंतु कायदा, नियम व पोटनियम यानुसार आवश्यक तेवढे भाग जोपर्यंत सभासद खरेदी करत नाही आणि त्यासाठी आवश्यक रकमेचा भरणा करत नाही तोपर्यंत त्यास सभासदत्वाचे हक्क बजावता येणार नाहीत.

त्याशिवाय बँकेने किमान भाग भांडवलाची मर्यादा वाढविल्यास व त्याप्रमाणे सभासदास मागणी नोटीस पाठवून पुरेसा कालावधी दिल्यास सभासदत्वाचे हक्क बजावण्याकरिता त्या रकमेचा भरणा करणे आवश्यक राहील.

(२) बँकेच्या सभासदाची कर्तव्ये पुढीलप्रमाणे-

सभासद झालेल्या दिनांकापासुन पुढील सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेणे.

सभासद झालेल्या दिनांकापासुन पुढील सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ ज्याने घेतला नसेल, अशा सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकरण केल्याबाबतचे पत्र असे आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० दिवसांचे आत बँकेतर्फे पाठविण्यात येईल. त्यानंतरच्या पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेणार नाही, त्याला कायद्याचे कलम ३५ नुसार बँक निष्कासित करू शकेल.

ज्या सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून संबोधले जाईल, त्याला परत क्रियाशील सभासद होईपर्यंत बँकेच्या कोणत्याही सवलतीचा लाभ मिळणार नाही.

सभासद क्रियाशील आहे अथवा अक्रियाशील आहे, यामध्ये मतभेद झाल्यास याबाबतचे अपिल निबंधकांकडे अशी सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत करता येईल.

कायद्यामधील सदर दुरुस्ती प्रसिद्ध झाल्यानंतर लगेचच ज्या बँकांची निवडणूक होणार आहे, अशा बँकांच्या सर्व सभासदांना जोपर्यंत ते अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकृत केले जात नाहीत तोपर्यंत त्या सभासदास मतदानाचा अधिकार राहील.

## १३) सभासदत्वाचा अर्ज व त्याबाबतची कार्यवाही :

(अ) सामान्य सभासदत्वासाठी अर्जदाराने बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे विहीत नमुन्यात रू.१००/- इतक्या प्रवेशफी सहीत अर्ज सादर केला पाहिजे. अर्जदाराने त्याबरोबरच बँकेच्या साठ भागांची रक्कम रू.१५००/- अर्ज सादर करताना भरली पाहिजे.

(ब) जे अर्ज सर्व दृष्टीने परिपूर्ण आहेत व योग्य त्या रकमेचा भरणा केलेला आहे, अशा अर्जांवर बँकेतर्फे अर्ज मिळाल्यापासून ९० दिवसांचे आत निर्णय घेतला जाईल व असा निर्णय घेतल्यापासून ६० दिवसांचे आत तो अर्जदारास कळविला जाईल.

## १४) क्रियाशील सभासद :

क्रियाशील सभासद म्हणजे अशी व्यक्ती, जिला सामान्य सभासद म्हणून प्रवेश दिला आहे आणि ज्या सभासदाने सभासद झालेल्या दिनांकापासुन पुढील सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियम १५(२) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेतला आहे.

## १५) क्रियाशील सभासद होण्यासाठी किमान अटी :

क्रियाशील सभासद होण्यासाठी बँकेच्या सामान्य सभासदास खालीलप्रमाणे अटींची पूर्तता करावी लागेल.

(१) त्याने बँकेचे रू.२५/- दर्शनी मूल्य असलेले किमान ६० भाग धारण केलेले असावेत, आणि

(२) त्याच्या सर्व प्रकारच्या ठेव खात्यांमध्ये कमीत कमी एका वर्षाकरिता किमान रू.७,०००/- इतकी एकूण ठेव रक्कम असावी अथवा त्याने कर्जदार म्हणून बँकेकडून मागील पाच वर्षांतील सलग दोन वर्षांकरिता किमान रू.१,००,०००/- एवढे कर्ज/उचल घेतलेली असावी.

**तरतूद १ :**

'ठेवधारक' म्हणजे ज्या सामान्य सभासदाची बँकेच्या सर्व प्रकारच्या खात्यांमधून कमीत कमी सलग एका वर्षाकरिता किमान रक्कम रू.७,०००/- इतकी एकूण ठेव स्वतःच्या नावे अथवा ज्या संस्थेचा तो मालक /संचालक/ पदाधिकारी/ट्रस्टी म्हणून प्रतिनिधीत्व करतअसेल त्या संस्थेच्या /कंपनीच्या /सोसायटीच्या / ट्रस्टच्या खात्यांमध्ये आहे अशी व्यक्ती.

**तरतूद २ :**

'कर्जदार' म्हणजे असा सामान्य सभासद की, जो मागील पाच वर्षांतील सलग दोन वर्षांकरिता बँकेच्या कोणत्याही प्रकारच्या मंजूर / उचल घेतलेल्या कर्जाची किमान रू.१,००,०००/- ची मंजूर सुविधा वापरत आहे.

## १६) क्रियाशील सभासदांचे अधिकार :

(१) बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार. कोणत्याही व्यक्तिगत सभासदास प्रतिनिधीद्वारे (प्रॉक्सी) मतदान करता येणार नाही.

तथापि, कोणतीही संस्था, कंपनी, भागीदारी फर्म, नोंदणीकृत विश्वस्त संस्था यांना संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये मतदान करण्यासाठी प्रतिनिधीची नेमणूक करता येईल.

(२) सामान्य सभासदांचे सदर पोटनियमांमध्ये उल्लेख केलेले सर्व अधिकार क्रियाशील सभासदास राहतील.

## १७) बँकेच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्याचा अधिकार :

(१) फक्त क्रियाशील सभासदांना त्यांनी कितीही भाग भांडवल धारण केले असले, तरी एका मताचा अधिकार राहील.

(२) क्रियाशील सभासद व्यक्तीस स्वत: मतदान करण्याचा अधिकार राहील. संस्था, कंपनी, भागीदारी फर्म, नोंदणीकृत विश्वस्त संस्था यांना संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये मतदान करण्यासाठी प्रतिनिधी म्हणून भागीदार, संचालक किंवा पदाधिकारी यांची नेमणूक करता येईल.

(३) क्रियाशील सभासदास कायद्याचे कलम ७३ सीए(१)(i) मध्ये वर्णन केल्यानुसार थकबाकीदार झाल्यास मतदान करता येणार नाही.

## १८) सहयोगी सभासदत्व : अधिकार व जबाबदाऱ्या :

(१) बँकेचे भाग एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या नावे संयुक्तरीत्या घेता येतील.

(२) सहयोगी भागधारकाचे बाबतीत कोणाच्याही मृत्यूनंतर हयात असलेल्या व्यक्ती संयुक्त/व्यक्तिगत भागधारक म्हणून गणल्या जातील.

(३) सहयोगी भागधारक संबंधित भागांबाबतच्या देण्यास संयुक्तपणे किंवा विभक्तरीत्या जबाबदार राहतील.

(४) संयुक्त भागधारकाचे बाबतीत भाग दाखल्यावर ज्याचे प्रथम नाव लिहिले असेल, त्याला सभासदाचे सर्व हक्क प्राप्त होतील व तो वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस मिळण्यास व जाहीर केल्यानुसार लाभांश मिळण्यास पात्र राहील.

(५) ज्या वेळेस क्रियाशील सभासद बँकेचे भाग एकापेक्षा जास्त व्यक्तींबरोबर संयुक्तरीत्या धारण करत असेल, त्या वेळेस ज्या व्यक्तीचे नाव प्रथम असेल त्या व्यक्तीस मतदानाचे अधिकार प्राप्त होतील. पण त्या व्यक्तीच्या गैरहजेरीत ज्या व्यक्तीचे नाव दुसऱ्या नंबरवर असेल, त्या व्यक्तीस मतदानाचे अधिकार असतील. पहिल्या दोघांच्या अनुपस्थितीत हाच नियम प्रत्येक पुढील नावे असलेल्या व्यक्तीस लागू होईल. मात्र अशी व्यक्ती पोटनियम ११ (३) नुसार अपात्र असता कामा नये.

## १९) नाममात्र सभासद :

(१) एखादी व्यक्ती अविभक्त हिंदू कुटुंबाची सहभागीदार असेल अथवा कर्जदार सभासदास जामीनदार म्हणून राहणार असेल अथवा एखाद्या व्यक्तीस तात्पुरती गरज भागविण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या परवानगीनुसार कर्ज घ्यावयाचे असेल, त्यास विहीत नमुन्यात अर्ज व विनापरतीची प्रवेश फी रु.५/- व वर्गणी रु.१००/- भरल्यानंतर, परंतु कर्जदार व जामीनदार म्हणून असलेली सर्व देणी परत केल्यानंतर आपोआप त्याचे नाममात्र सभासदत्व संपुष्टात येईल, या अटीवर आणि जो बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत आहे, अशा व्यक्तीस नाममात्र सभासद करून घेता येईल.

(२) बँकेच्या कर्मचाऱ्यांनाही नाममात्र सभासद होता येईल व त्याला नाममात्र सभासदांप्रमाणे फायदे मिळतील.

(३) नाममात्र सभासदत्व पुढील बाबींना पात्र असणार नाही.

(अ) भाग दाखला मिळणे.

(ब) लेखापरीक्षण झालेली आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल मिळणे.

(क) वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभांना हजर राहणे, भाग घेणे, मतदान करणे.

(ड) लाभांश मिळणे.

(इ) संचालक मंडळाच्या निवडणुकीस उभे राहणे व मतदान करणे.

## २०) सभासदांची जबाबदारी :

सभासदांनी घेतलेल्या भागांच्या रकमेइतकीच त्याची जबाबदारी मर्यादित राहील.

## २१) सभासदांची ओळख (के.वाय.सी. नॉर्म्स लागू करणेबाबत) :

बँकेबरोबर होणाऱ्या सर्व व्यवहारांचे बाबतीत सभासदांची ओळख असणे आवश्यक आहे. सदर ओळखीसाठी सर्व व्यक्तिगत सभासदांनी रिझर्व्ह बँकेने लागू केलेल्या आपला ग्राहक जाणा (के.वाय.सी.) या मार्गदर्शक तत्त्वांची पूर्तता करणे आवश्यक आहे. सध्या असलेल्या सभासदांनी सुद्धा सदर बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सभासदांची ओळख बँकेमधील अधिकारी किंवा अधिकृत अधिकारी करतील. यासाठी सभासदांना बँकेकडून पहिले एक ओळखपत्र नि:शुल्क दिले जाईल. ज्या वेळी सभासदास त्याचा कोणताही हक्क बजावयाचा असेल - उदा. वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे व मतदान करणे, लाभांशपत्र घेणे, कर्जदार/जामीनदार म्हणून करार करणे, संचालक मंडळाच्या निवडणुकीत मतदान करणे इत्यादी किंवा अन्य कोणताही हक्क जो बँक वेळोवेळी प्रसिद्ध करेल, त्या वेळी हक्क बजावताना ओळखपत्र सादर करणे आवश्यक राहील.

संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी भारताच्या निवडणूक आयोगाने निश्चित केलेले कोणतेही ओळखपत्र सादर करता येईल.

सभासदास ओळखपत्र सादर करणे अशक्य झाल्यास त्या वेळी त्या कारणापुरता त्याचा हक्क बँक नाकारू शकेल.

ओळखपत्र हरविल्यास अथवा गहाळ झाल्यास बँकेकडून ओळखपत्राची दुसरी प्रत मिळेल, तथापि अशा प्रतीस बँकेने वेळोवेळी ठरविलेले नाममात्र शुल्क आकारले जाईल.

**टीपः** या पोटनियमानुसार अधिकृत अधिकारी म्हणजे बँकेने सदर कामकाजासाठी नेमलेली व्यक्ती/नेमलेल्या व्यक्ती होय.

## २२) सभासदत्वाचा राजीनामा देणे :

(१) सभासद आपल्या सभासदत्वाचा राजीनामा देऊन स्वतःचे भाग भांडवल संचालक मंडळाचे संमतीने परत घेऊ शकेल, परंतु तसे करण्यापूर्वी त्याच्याकडे कर्ज व जामीनकीपोटी येणे असलेल्या सर्व रकमांची परतफेड झाली असली पाहिजे. तसेच सभासदत्वाचा राजीनामा देताना किमान १ वर्षाचा कालावधी झालेला असावा व त्यासाठीची सूचना किमान १ महिना अगोदर देणे आवश्यक आहे. कोणत्याही सहकारी वर्षात अशा तऱ्हेने परत करण्यात येणारे भांडवल त्यापूर्वीच्या दि. ३१ मार्च रोजी असलेल्या वसूल भाग भांडवलाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही. अशा परत करण्यात येणाऱ्या भाग भांडवलाची किंमत त्या अगोदरच्या वर्षाच्या मूल्यांकनानुसार येणारी किंमत किंवा दर्शनी किंमत यापैकी कमी असणारी रक्कम असेल.

(२) ज्या सभासदांनी राजीनामा देऊन भाग भांडवल काढून घेतले आहे, अशा सभासदांना राजीनामा दिल्यापासून किमान १ वर्षापर्यंत बँकेचे सभासदत्व परत मिळण्यास परवानगी दिली जाणार नाही.

## २३) सभासदत्वाचे निष्कासन करणे :

(१) बँकेच्या कोणत्याही सभासदाचे निष्कासन हे कायदा, नियम व त्यासाठीच्या सर्वसाधारण सभेतील उपस्थित व मतदान करणाऱ्या सभासदांमधील ३/४ सभासदांच्या बहुमताने यासंबंधित पारित झालेल्या ठरावानुसार राहील. कोणत्याही सभासदाच्या बँकेस अपायकारक ठरणाऱ्या व हानी पोहोचवू शकणाऱ्या कृत्यांमुळे बँकेच्या कामकाजात अडचणी येत असतील, तर अशा सभासदाचे निष्कासन बँक करेल.

(२) निष्कासन झालेल्या सभासदास त्याची बाजू कायदा व नियम यानुसार मा. निबंधक यांचेपुढे मांडता येईल व मा. निबंधकाचे मंजुरीनंतरच संबंधित सभासदाचे सभासदत्व संपुष्टात येईल.

(३) निष्कासित झालेल्या कोणत्याही सभासदास निष्कासन झाल्यापासून १ वर्षाच्या कालावधीपर्यंत पुनश्च सभासदत्व दिले जाणार नाही.

## २४) सभासदत्व संपुष्टात येणे :

पुढील बाबतीत सभासदत्व संपुष्टात येईल.

(अ) व्यक्तिगत सभासदाचा मृत्यू झाल्यास किंवा भागीदारी संस्था, कंपनी व इतरांच्या बाबतीत विसर्जन अथवा दिवाळखोरी झाल्यास.

(ब) नादारी जाहीर झाल्याने अथवा कायदेशीर तरतुदीने सभासद राहण्यास लायक न ठरल्यास.

(क) सर्व भागांचे दुसऱ्याचे नावावर हस्तांतरण केल्यास. (सदर नियम हा ज्या वेळी नक्त मूल्य ऊणे नाही, त्या वेळी लागू होईल.)

(ड) राजीनामा दिल्याने किंवा सभासदत्व कमी करण्याची मागणी मान्य झाल्यास.

(इ) सभासदाचे कायदा व नियमानुसार निष्कासन झाल्यास. अशा निष्कासनामुळे भागांची रक्कम जप्त करता येऊ शकेल.

(फ) कायदा, नियम व पोटनियम यांनुसार अपात्र ठरल्यास.

(ग) बँकेने lien & setoff चा अधिकार वापरल्यास.

(ह) कोणत्याही गुन्ह्यासाठी शिक्षा झाली असेल, अशी व्यक्ती. अशा गुन्ह्यांमध्ये राजकीय स्वरूपाचे गुन्हे सोडून इतर गुन्ह्यांचा समावेश असेल आणि शिक्षा होऊन ५ वर्षांचा कालावधी लोटला नसेल.

## २५) भाग दाखला :

(१) प्रत्येक व्यक्ती सभासद म्हणून स्वीकृत झाल्यावर त्या व्यक्तीने घेतलेल्या भागाबद्दल भाग दाखला (विनाशुल्क) मिळण्यास पात्र होईल. भाग दाखल्यावर घेतलेल्या भागांचा उल्लेख असेल व त्यांचे अनुक्रमांक असतील. भाग दाखल्यावर बँकेचे अध्यक्ष अथवा अधिकार दिलेले संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या असतील. तसेच बँकेची मोहर (सील) त्यावर असेल.

(२) जर कोणताही भाग दाखला हरवला, गहाळ झाला, नष्ट झाला; तर त्याऐवजी संचालक मंडळाने ठरविलेल्या दरानुसार शुल्क भरल्यानंतर दुसरा भाग दाखला दिला जाऊ शकेल. परंतु त्यासाठी सभासदाने भाग दाखला गहाळ झाल्याबाबतचा, हरवल्याबाबतचा, नष्ट झाल्याबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. तसेच सभासदाने त्यासाठी बँकेस आवश्यक तो इंडेम्निटी बाँड देणे आवश्यक आहे.

**२६) नामांकन :**

सभासदास आपले पश्चात बँकेतील हक्क, जबाबदारी घेण्यासाठी नामनिर्देशित व्यक्तीची नेमणूक करता येईल. वारस नेमण्याबाबत विहीत नमुन्यात अर्ज केला पाहिजे व बँकेचे नोंदणीकृत कार्यालयात ठेवलेल्या वारस नोंदणी रजिस्टरमध्ये त्याची नोंद झाली पाहिजे. जर वारस बँकेचा सेवक असेल, तर मा. संचालक मंडळाची पूर्वपरवानगी घेतली पाहिजे. कोणत्याही वेळी अगोदर नोंदलेले वारसपत्र मागे घेऊन नवीन वारसपत्र दाखल करता येईल, मात्र त्या-संबंधीची लेखी माहिती बँकेस दिली पाहिजे. तसेच नवीन वारसपत्र दाखल करताना मा. संचालक मंडळाने वेळोवेळी ठरविलेले शुल्क भरावे लागेल.

**२७) सभासदाचा मृत्यू :**

सभासदाच्या मृत्यूनंतर त्या सभासदाच्या भागांची रक्कम नेमलेला/ल्या वारस/वारसांना आलेल्या अर्जापासून १२ महिन्यांचा आत दिली पाहिजे. वारस नेमला नसेल तर संचालक मंडळास जो त्याचा कायदेशीर वारस आहे अथवा जो मृत्यू पावलेल्या सभासदाचा कायदेशीर प्रतिनिधी आहे, अशी खात्री असेल, त्यास बँक रक्कम देईल. अशा वेळी संचालक मंडळाने ठरविलेल्या अटींनुसार योग्य तो इंडेम्निटी बाँड द्यावा लागेल.

**२८) माजी सभासदांची जबाबदारी व मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता :**

ज्या वेळी कायद्यानुसार बँकेस बँकिंग व्यवसाय गुंडाळण्याचा आदेश मिळेल, त्या वेळी माजी सभासदांची जबाबदारी व आदेशाचे तारखेपूर्वी दोन वर्षांचे आत मृत्यू पावलेल्या सभासदाची मालमत्ता अवसायनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहील. परंतु सभासदाची जबाबदारी ही त्याचे सभासदत्व संपुष्टात येण्याच्या दिवशीची व मृत्यू पावलेल्या सभासदाच्या मृत्यूच्या दिनांकाचे वेळी त्याच्या भाग भांडवलाइतकीच मर्यादित राहील.

**२९) सभासदांचे भाग भांडवल, लाभांश व ठेवींवरील बँकेचा हक्क :**

सभासद किंवा माजी सभासदाकडे बँकेचे येणे असेल तर त्यापोटी बँकेत सभासदाचे असलेल्या भागांवर, लाभांशावर व ठेवींवर बँकेचा प्रथम अग्रहक्क व बोजा राहील. बँक केव्हाही त्याच्या जबाबदारीपोटी त्याला देय असलेली रक्कम परस्पर वळती करून घेऊ शकेल.

**३०) भाग वर्ग अथवा भाग रक्कम अशंत: परत करणेबाबत :**

अ) सभासद स्वत:चे नावावरील आवश्यक भाग रक्कम ठेवून संचालक मंडळाचे संमतीने अंशत: परत घेऊ शकेल.

ब) एखाद्या सभासदास त्याने धारण केलेले भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर संचालक मंडळाच्या संमतीने दुसऱ्या सभासदाच्या नावे वर्ग करता येतील. मात्र ज्या सभासदाचे नावावर भाग वर्ग झाले असतील, त्याचे नाव भागांच्या रजिस्टरमध्ये नोंदले गेल्याशिवाय वर्ग व्यवहार पूर्ण झाला, असे म्हणता येणार नाही. तसेच यासाठी शुल्क म्हणून संचालक मंडळ वेळोवेळी ठरवेल ती रक्कम भरावी लागेल.

खालील कारणांसाठी भाग वर्ग करणे नाकारले जाईल.

(१) जर सभासदावर कर्जाचा बोजा/जामीनकीची जबाबदारी असेल तर.

(२) जर भाग वर्ग करणे बँकेच्या हितसंबंधास हानिकारक असेल तर.

(३) ज्या व्यक्तीच्या नावावर भाग वर्ग करावयाचे असतील, ती व्यक्ती पोटनियम क्र. ११ मधील तरतूद पूर्ण करत नसली तर.

(४) जर सभासदास धारण केलेले सर्व भाग वर्ग करावयाचे नसतील तर.

**३१) सर्वसाधारण सभा :**

(१) बँकेच्या सामान्य व सर्व क्रियाशील सभासदांचा समावेश सर्वसाधारण सभेत होईल.

(२) कायदा व नियम यांना अधीन राहून बँकेचे व्यवहाराबाबतचे सर्व अंतिम अधिकार सर्वसाधारण सभेकडे राहतील.

(३) साधारण सभा दोन प्रकारच्या असतील–

(अ) वार्षिक सर्वसाधारण सभा.

(ब) विशेष सर्वसाधारण सभा.

**३२) सर्वसाधारण सभेची कामे व अधिकार :**

बँकेचे संचालक मंडळ ठरावाद्वारे दर वर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर ६ महिन्यांचे आत वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करेल. सदर सभा खालील कामकाजाकरिता बोलावली जाईल.

(१) मागील साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

(२) संचालक मंडळाच्या बँकेच्या कार्याबद्दलचा वर्षअखेरच्या अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.

(३) लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.

(४) लेखापरीक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.

(५) मागील लेखापरीक्षण झालेल्या अहवालाच्या, दोषदुरुस्ती अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे

(६) कायदा व नियम यास अनुसरून संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे. मात्र संचालक मंडळाने शिफारस केल्यापेक्षा जास्त लाभांश जाहीर करता येणार नाही.

(७) पुढील वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि प्रगतीच्या तक्त्याची माहिती घेणे.

(८) सभासदाचे निष्कासन करणे - जर असेल तर.

(९) पोटनियम दुरुस्ती करणे - जर असेल तर.

(१०) लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

(११) सेवकांची रचना व नेमणुकीस मान्यता देणे- जर असेल तर.

(१२) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाइकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

(१३) बँकेच्या स्वत:च्या उपयोगितेकरीता खरेदी केलेली जमीन किंवा इमारत, इमारतीचे बांधकामास मान्यता देणे.

(१४) बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षण याकरिता बँकेने केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे.

(१५) तक्रार निवारण व तडजोड समितीची नियुक्ती करणे.

(१६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ठेवलेले अन्य कोणतेही विषय.

## ३३) विशेष सर्वसाधारण सभा :

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळाच्या आदेशानुसार केव्हाही अथवा मा. निबंधक यांच्याकडील सूचना मिळाल्यापासून अथवा २५० किंवा एकूण सभासदांमधील १/५ सभासदांच्या सह्यांनी आलेल्या लेखी विनंतीनुसार ३० दिवसांमध्ये विशेष सर्वसाधारण सभा बोलावतील. विशेष सर्वसाधारण सभेमध्ये फक्त सूचनेमध्ये दिलेल्या विषयांवर विचार केला जाईल.

## ३४) वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेची सूचना :

(१) वार्षिक सर्वसाधारण सभा १४ दिवस अगोदर लेखी स्वरूपात सर्व सभासदांना सूचना देऊन बोलाविली जाईल.

(२) विशेष सर्वसाधारण सभा ७ दिवस अगोदर लेखी स्वरूपात सर्व सभासदांना सूचना देऊन बोलावली जाईल.

(३) वार्षिक सर्वसाधारण सभेची / विशेष सर्वसाधारण सभेची सूचना व्यापक खपाच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केली जाईल; तसेच नोंदणीकृत कार्यालयात नोटीस बोर्डवर तसेच बँकेच्या शाखांमध्ये मागील लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, लेखापरीक्षकांचा आर्थिक वर्षासंबंधीचा अहवाल व संचालक मंडळाचा अहवाल यासहित लावली जाईल. तसेच संचालक मंडळाची निवडणूक असल्यास त्यासंबंधी व पोटनियम दुरूस्ती असल्यास त्यासंबंधीची सूचना त्यासोबत लावली जाईल.

(४) उपरोक्त सर्वसाधारण सभेची सूचना सर्व क्रियाशील व अक्रियाशील सभासदांना पुढीलपैकी कोणत्याही एका पध्दतीने पाठविली जाईल.

अ) स्थानिक वाटप पध्दतीने

ब) साध्या पोस्टाने

क) इ-मेलद्वारे

ड) कुरिअरद्वारे

इ) शाखा कार्यालयांमार्फत.

(५) सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये सभेची जागा, तारीख व वेळ यांचा स्पष्ट उल्लेख असला पाहिजे. तसेच सूचनेमध्ये गणपूर्ती अभावी तहकूब झालेल्या सभेची तारीख, जागा व वेळ याचाही उल्लेख असला पाहिजे.

(६) कोणत्याही सर्वसाधारण सभेची सूचना मिळाली नाही, हे सभा तहकूब करण्यासाठी अथवा पुढे ढकलण्यासाठी पुरेसे कारण ठरणार नाही.

(७) सर्वसाधारण सभेची सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने दिली जाईल.

## ३५) वार्षिक सर्वसाधारण व विशेष सर्वसाधारण सभेची गणपूर्ती :

(१) कोणत्याही सर्वसाधारण सभेस एकूण सभासदांमधील १/५ सभासद किंवा ३०० सभासद यांपैकी जी संख्या कमी असेल, इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली, असे समजण्यात येईल.

(२) साधारण सभेचे कामकाज सभेच्या वेळेस गणपूर्ती न झाल्यास चालविण्यात येणार नाही.

(३) ठरविण्यात आलेल्या वेळेस गणपूर्ती झाली, नाही तर अशी सभा तहकूब करण्यात येईल आणि ती अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

(४) सभेच्या दरम्यान कोणत्याही वेळी असे लक्षात आले की, गणपूर्तीसाठी आवश्यक तेवढे सभासद उपस्थित नाहीत, तर अध्यक्ष किंवा सभेचे अध्यक्षस्थान भूषविणारी व्यक्ती अशी सभा तहकूब करेल आणि उर्वरित कामकाज नेहमीच्या पद्धतीने तहकूब सभेत पूर्ण केले जाईल.

(५) वरील क्रमांक ३ व ४ नुसार तहकूब केलेली सभा त्याच दिवशी अथवा अन्य कोणत्याही दिवशी, कोणत्याही ठिकाणी व कोणत्याही वेळेस ७ दिवसांचे आत अध्यक्ष ठरवतील त्याप्रमाणे घेण्यात येईल.

(६) तहकूब झालेल्या सभेमध्ये सभेच्या सूचनेवर असलेल्या विषयांव्यतिरिक्त कोणत्याही विषयाचे कामकाज चालविले जाणार नाही.

(७) तहकूब झालेल्या सभेमध्ये गणपूर्ती नसेल, तरीही सभेचे नियमित कामकाज पार पाडता येईल.

(८) विशेष सर्वसाधारण सभेसाठी एकूण सभासदांमधील १/५ सभासद किंवा ३०० सभासद यांपैकी जी संख्या कमी असेल, इतके सभासद हजर असले म्हणजे गणपूर्ती झाली, असे समजण्यात येईल.

**३६) सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष :**

संचालक मंडळाचे अध्यक्ष सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष असतील. त्यांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष आणि दोघांच्याही गैरहजेरीमध्ये हजर असलेले व मतदानाचा हक्क असलेले सभासद आपल्यापैकी एकाची निवड सभेच्या अध्यक्षपदासाठी करतील.

**३७) ठराव :**

ज्याबाबत विशिष्ट तरतूद कायदा, नियम व पोटनियम यात असतील असे विषय वगळता इतर बाबतींत ठराव मताधिक्याने मंजूर करण्यात येतील.

**३८) सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त :**

साधारण सभेचे इतिवृत्त सभा झाल्यापासून ३० दिवसांचे आत त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. सदर इतिवृत्तावर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या कराव्यात. अशा प्रकारचे सह्या केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अचूक पुरावा म्हणून समजले जाईल.

**३९) संचालक मंडळ :**

(१) बँकेचे कार्यकारी व्यवस्थापन संचालकांच्या संचालक मंडळाकडे राहील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| सर्वसाधारण गट | ११ |
| अनुसूचित जाती/जमाती | ०१ |
| महिला | ०२ |
| इतर मागासवर्गीय | ०१ |
| भटक्या जाती/जमाती | ०१ |
| एकूण | १६ |

(अ) ११ संचालक बँकेच्या क्रियाशील सभासदांमधून निवडले जातील. (सर्वसाधारण गट)

(ब) वरील संचांलकांव्यतीरीक्त बँकेच्या क्रियाशील सभासदांमधून बँक दोन संचालक तज्ञ संचालक म्हणून स्वीकृत करू शकते. सदर संचालकांना बँकेच्या व्यवस्थापनाच्या मधल्या फळीत काम केल्याचा किमान १० वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. किंवा बँकिंगसंबंधीची व्यावसायिक शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. यासाठी व्यावसायिक शिक्षण म्हणजे सी.ए. / आय.सी.डब्ल्यू.ए. / सी.एस. / सी.ए.आय.आय.बी. / एम.बी.ए.(बँकिंग अॅन्ड फायनान्स) वकील/निवृत्त बँक अधिकारी/ बँकिंगसंबंधी प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक की, ज्यांना प्रशिक्षण देण्याचा किमान १० वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

(२) **स्पष्टीकरण**

(अ)संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशील सभासदांमधील अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींसाठी राखीव असेल.

(ब)संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशील सभासदांमधील इतर मागासवर्गीयांसाठी राखीव असेल.

(क)संचालक मंडळावरील एक जागा क्रियाशील सभासदांमधील भटक्या जाती, विमुक्त जाती किंवा विशेष मागासवर्गीयांसाठी राखीव असेल.

(टीप- वरील राखीव जागांपैकी संचालक मंडळावर कोणत्याही जागेसाठी व्यक्ती निवडून आली नाही, तर अशी जागा बँकेची निवडणूक लढविण्यास पात्र असलेले क्रियाशील सभासदांमधून कायदा कलम ७३ ब(३) नुसार नियुक्तीद्वारे भरली जाईल.

(ड)संचालक मंडळामधील २ जागा क्रियाशील महिला सभासदांसाठी कायदा कलम ७३ सी नुसार राखीव असतील.

(टीप- क्रियाशील महिला सभासद सदर निवडणूक लढविण्यास पात्र राहील. जर अशा जागेवर महिला संचालक निवडून आली नाही, तर कायद्याचे कलम ७३ सी(२) नुसार दोन पात्र महिला संचालक नियुक्त करण्यात याव्यात.)

## ४०) संचालक म्हणून निवडणूक लढविण्यास पात्रता :

सभासदाने खालील अटी पूर्ण केल्याशिवाय त्यास संचालकपदासाठीची निवडणूक लढविण्यास पात्र ठरविले जाणार नाही.

त्याने किमान ६०० भाग(एकूण रू.१५,०००/-) घेणे आवश्यक आहे आणि त्याच्या सर्व प्रकारच्या ठेव खात्यांत सलग दोन वर्षांसाठी किमान रू.१,००,०००/- एकूण ठेव रक्कम असावी.

**(टीपः- निवडून आलेल्या संचालकांना मुदत ठेव रक्कम किमान रु. १,००,०००/- संचालक मंडळाचे पूर्ण मुदतीपर्यंत ठेवावी लागेल. सदर ठेवीवर कोणत्याही प्रकारचे कर्ज घेता येणार नाही.)**

मात्र राखीव जागांसाठी पात्रता निकष, हे वरील पात्रता निकषांच्या ५० टक्के राहतील.

**४१) अध्यक्ष व उपाध्यक्ष :**

(अ) निवडणुकीनंतरच्या पहिल्या सभेमध्ये निवडून आलेल्या संचालकांमधून ५ वर्षांसाठी अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड संचालक मंडळ करेल. ५ वर्षांचा कालावधी निवडणुकीच्या तारखेपासून मोजला जाईल. सदर सभेचे अध्यक्षस्थान कायदा आणि नियमांतील तरतुदींनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने नेमलेला प्रतिनिधी भूषवेल.

(ब) संचालक मंडळाच्या सर्व सभांचे अध्यक्षपद अध्यक्ष भूषवतील, अध्यक्षांच्या गैरहजेरीत सभांचे अध्यक्षपद उपाध्यक्ष भूषवतील व दोघांच्याही गैरहजेरीत संचालक मंडळातील सदस्य आपल्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून निवड करतील.

(क) सभेच्या अध्यक्षांना स्वतःच्या मताव्यतिरिक्त निर्णायक मत राहील. सदर निर्णायक मताचा वापर समान मते पडल्यास करता येईल.

(ड) कार्यलक्ष्यी संचालकांना अध्यक्ष/उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीमध्ये मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

**४२) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे अधिकार व कामे :**

(१) अध्यक्षांना खालील अधिकार व कार्ये पार पाडावी लागतील.

(अ) साधारण सभा, संचालक मंडळ सभा व दोन उपसमिती सभा यांचे अध्यक्षपद भूषविणे. तसेच प्रासंगिक समितीचे देखील अध्यक्षपद भूषविता येईल.

(ब) अध्यक्षपद भुषविलेल्या सर्व सभांच्या इतिवृत्तावर सह्या करणे.

(क) एखाद्या ठरावावर सभेमध्ये समान मते पडल्यास अशा ठरावावर निर्णायक मत देणे. (कास्टिंग व्होट)

(ड) सर्वसाधारण सभा, संचालक मंडळ, कार्यकारी समिती व इतर सभांचे आयोजन करणे.

(इ) स्वतःस असलेल्या अधिकारांमधील काही अधिकार उपाध्यक्षांना प्रदान करणे.

(फ) संचालक मंडळाचे अध्यक्ष, कार्यकारी व इतर उपसमित्यांचे वतीने तातडीचे व महत्त्वाचे निर्णय घेऊ शकतील असे निर्णय संबंधित सभेपुढे अथवा संचालक मंडळाच्या सभेपुढे पुनर्मान्यतेसाठी ठेवले जातील.

(२) उपाध्यक्षांना अध्यक्षांच्या गैरहजेरीमध्ये त्यांचे सर्व उपरोक्त कामकाज पार पाडावे लागेल.

## ४३) संचालक मंडळाचे इतिवृत्त :

संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्यासाठी ठेवलेल्या स्वतंत्र इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे आवश्यक आहे. सदर इतिवृत्तावर पुढील संचालक मंडळ सभेच्या अगोदर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सह्या कराव्यात व पुढील सभेत इतिवृत्त कायम करण्यात यावे. अशा प्रकारचे सह्या केलेले व मोहोर केलेले इतिवृत्त सभेमध्ये झालेल्या कामकाजाचा अचूक पुरावा म्हणून समजले जाईल.

## ४४) संचालक मंडळाचे अधिकार व कार्ये :

(अ) संचालक मंडळास बँकेचे कामकाज विविध कायद्यांतर्गत सुरळीत व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले सर्व अधिकार आहेत.

(आ) कोणत्याही सर्वसाधारण अधिकारांना बाधा न आणता संचालक मंडळास असलेले अधिकार खालीलप्रमाणे–

(१) सभासदत्व मंजूर करणे.

(२) बँकेसाठी संघटनात्मक उद्दिष्टे ठरविणे व सदर उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे, पतधोरण ठरविणे.

(३) रिझर्व्ह बँकेच्या व सहकार खात्याच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विविध उपसमित्यांचे गठन करणे.

(४) बँकेच्या व्यवहारांचा कालनिहाय आढावा/परीक्षण करणे.

(५) मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे वा त्यांना काढून टाकणे.

(६) कर्मचाऱ्यांची नेमणूक, त्यांना द्यावयाचे पगार व भत्ते, सेवेच्या अटी व शर्ती, शिस्तभंगाची कारवाई इत्यादींचे नियंत्रणासाठी योग्य ती तरतूद करणे.

(७) सर्वसाधारण सभेपुढे वार्षिक अहवाल, वार्षिक आर्थिक पत्रके, वार्षिक अंदाजपत्रक इ. मंजुरीसाठी ठेवणे.

(८) लेखापरीक्षण अहवाल व त्यावरील पूर्तता अहवालाचा विचार करणे व सदर अहवाल साधारण सभेपुढे ठेवणे.

(९) इतर सहकारी संस्थांच्या सभासदत्वाचा आढावा घेणे.

(१०) वार्षिक व पुरवणी अंदाजपत्रकाचा आढावा घेणे.

(११) निधींची उभारणी करणे.

(१२) सभासदांना कर्जे मंजूर करणे.

(१३) गुंतवणूक धोरण तयार करणे व परवानगी असलेल्या रोख्यांमध्ये बँकेचे निधी गुंतविणे.

(१४) शाखाविस्तार, विस्तारित कक्ष व प्रशासकीय कार्यालय व ए.टी.एम. केंद्रांसाठीच्या प्रस्तावांवर विचार करणे.

(१५) रिझर्व्ह बँकेच्या वेळोवेळी येणाऱ्या आदेशांनुसार ठेवी व कर्जांवरील व्याजदर निश्चित करणे.

(१६) संचालक मंडळाच्या निवडणुकीचे आयोजन करणे.

(१७) रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बँकिंग व्यवसाय करण्यासाठी विविध धोरणे व नियंत्रणे तयार करणे.

(१८) कायदा, नियम व पोटनियम यांनुसार आवश्यक असलेल्या, तसेच सर्वसाधारण सभेने अधिकार प्रदान केलेल्या सर्व बाबींवर कार्यवाही करणे व सर्व कामकाज पार पाडणे.

(१९) कोणत्याही कर्जाची किंवा सवलतीची पुनर्बांधणी/पुनर्रचना करणे.

(२०) सभासद, संचालक व कर्मचारी यांना शिक्षण व प्रशिक्षणासाठी योग्य अशी व्यवस्था करणे.

## ४५) संचालकपदासाठी अपात्र होणे :

कोणताही क्रियाशील सभासद बँकेवर संचालक म्हणून निवडून येण्यास, कोणत्याही प्रकारे स्वीकृत करण्यास अथवा संचालक सदस्य होण्यास अपात्र ठरेल, जर असा सभासद–

(१) कोणत्याही अधिकृत न्यायालयाने नादार म्हणून दोषी ठरविल्यास अथवा मानसिकदृष्ट्या दुर्बल आहे असे ठरविल्यास.

(२) बँक व्यवसायाच्या ज्या करारामध्ये संबंधित आहेत व भाग घेतला आहे व त्यामध्ये त्यास फायदा होत असेल तर.

(३) नैतिक अध:पतनाच्या बाबींमध्ये दोषी ठरविण्यात आले असेल तर

(४) बँकेतील अशा कोणत्याही फायदा होणाऱ्या पदावर असेल तर राज्य सरकारने वेळोवेळी जाहीर केलेल्या धोरणांनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा पूर्ण वेळ कर्मचारी किंवा सेवक प्रतिनिधी जरी पूर्ण वेळ पगार घेणारा सदस्य सोडून अशा पदांकरिता अपात्र ठरेल.

(५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम वा नियमानुसार अन्य कोणत्याही सहकारी बँकेचा अथवा सहकारी पतपेढीचा संचालक असल्यास.

(६) त्यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा निबंधकांच्या पूर्वपरवानगीशिवाय बँकेने भाडेतत्त्वावर किंवा मालकी हक्काने घेतलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत हितसंबंध असल्यास.

(७) कोणत्याही डिक्री अथवा रिकव्हरी सर्टिफिकेटनुसार त्यांचेकडून कोणत्याही वित्तीय संस्थेस कोणतीही रक्कम येणे असल्यास.

(८) बँकेमार्फत अथवा बँकेविरूद्ध काम करणाऱ्या कायदेशीर सल्लागाराकडे नोकरीत असल्यास अथवा त्यांचेशी संबंधित असल्यास. (खुलासा - कायदेशीर सल्लागार म्हणजे ॲडव्होकेट्स ॲक्ट १९६१ च्या कलम २ उपकलम १ मधील क्लॉज १ नुसार असणारी कायदेशीर सल्लागाराची व्याख्या)

(९) कायद्यानुसार कोणत्याही गुन्ह्यामध्ये दोषी ठरविला गेला असल्यास.

(१०) कायद्यानुसार सभासद म्हणून अपात्र ठरल्यास.

(११) कायद्यानुसार त्याचे सभासदत्व निष्कासित झाले असल्यास.

(१२) संचालक मंडळाच्या सततच्या ३ सभांना तो अनुपस्थित असल्यास व त्याच्या अनुपस्थितीस संचालक मंडळाने सूट दिलेली नसल्यास.

(१३) सततच्या २ वार्षिक सर्वसाधारण सभांना तो अनुपस्थित असल्यास व त्याच्या अनुपस्थितीस संबंधात वार्षिक सभेतील सभासदांनी सूट दिलेली नसल्यास.

(१४) संचालक मंडळ निवडणुकीकरिता नामनिर्देशन करताना क्रियाशील सभासद हा बँकेचा कर्जदार/कोणत्याही कर्जासाठी जामीनदार अथवा इतर कारणांसाठीदेखील बँकेचा देणेदार नसावा. (कर्ज म्हणजे स्वत:चे ठेवीवरील आणि एलआयपी तारण कर्ज सोडून अन्य कर्जे)

(१५) संचालकाने पोटनियम क्र. ४० प्रमाणे ठेवलेली रक्कम काढून घेतल्यास.

## ४६) संचालक मंडळ सभांसाठी गणपूर्ती :

संचालक मंडळ सदस्य संख्येच्या १/२ किंवा त्यापेक्षा जास्त संचालक उपस्थित असतील तर गणपूर्ती झाली असे समजण्यात येईल. सदर संख्या अपूर्णांकात आली तर त्याच्या जवळच्या पुढील पूर्ण संख्येत गणपूर्ती झाली, असे समजण्यात येईल. संचालक मंडळ सभेच्या गणपूर्तीसाठी कार्यलक्ष्यी संचालकांना मोजण्यात येणार नाही. पदाधिका-यांच्या निवडणुकीव्यतिरिक्तच्या सभांमध्ये, स्वीकृत तज्ज्ञ संचालकांचा समावेश गणपूर्तीत केला जाईल.

## ४७) संचालक मंडळावरील रिक्त जागा :

संचालक मंडळावरील कोणतीही जागा रिक्त झाल्यास सदर जागा कायद्याचे कलम ७३ अे अे अे (४) मधील तरतुदीनुसार भरली जाईल.

## ४८) संचालक मंडळ सभा :

(१) संचालक मंडळापुढे चर्चेसाठी आलेल्या विषयावर बहुमताने निर्णय होतील. जेथे समान मते पडतील, तेथे सदर सभेच्या अध्यक्षास एक निर्णायक मत (कास्टिंग व्होट) देण्याचा अधिकार राहील.

(२) संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त त्या कारणासाठी ठेवलेल्या इतिवृत्त पुस्तकात नोंदणे आवश्यक आहे.

(३) बँकेचे अध्यक्षांच्या परवानगीने मुख्य कार्यकारी अधिकारी संचालक मंडळ सभा बोलावतील.

(४) महिन्यातून किमान एकदा संचालक मंडळाची सभा होणे आवश्यक आहे.

(५) संचालक मंडळाची सभा शक्यतो बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात अथवा बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये ठेवण्यात यावी.

(६) बँकेचे अध्यक्ष हे संचालक मंडळ सभेचे अध्यक्ष राहतील. त्यांच्या अनुपस्थितीत बँकेचे उपाध्यक्ष हे सभेचे अध्यक्ष राहतील. वरील दोघांच्या अनुपस्थितीत सदर संचालक मंडळ सभेस उपस्थित असणाऱ्या संचालकांमधून एकाची त्या सभेकरिता अध्यक्ष म्हणून निवड करतील.

(७) संचालक मंडळ सभेची नोटीस ५ दिवसांच्या पूर्वसूचनेने पाठविणे आवश्यक आहे, परंतु तातडीच्या सभेसाठी २४ तासाच्या पूर्वसूचनेने सभा बोलविता येईल.

(८) अध्यक्ष हे संचालक मंडळ व कार्यकारी समितीचे सभेचे अध्यक्ष राहतील.

(९) संचालक सभा व समित्यांच्या बैठकींसाठी संचालक मंडळ व समिती सदस्य यांना कोणत्याही प्रकारचा भत्ता घेता येणार नाही.

## ४९) संचालक मंडळाच्या उपसमित्या :

संस्थेचे संचालक मंडळ एका कार्यकारी समितीचे आणि इतर समित्यांचे अथवा उपसमित्यांचे गरजेनुसार गठन करेल. कार्यकारी समिती सोडून इतर उपसमित्यांमध्ये जास्तीत जास्त ५ सदस्य असतील.

## ५०) तक्रार निवारण व तडजोड समिती :

सर्वसाधारण सभा, कलम ८९ अे बी (३) अन्वये, सभासद / ग्राहक आणि संस्था यांच्यामध्ये कर्ज व वसुली वादाव्यतिरिक्तचे वेळोवेळी निर्माण होणारे वाद, तक्रारी यांचे निराकरण करणयासाठी तक्रार निवारण व तडजोड समितीची स्थापना करेल. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल -

(अ) अध्यक्ष - माहीतगार आणि संस्थेचा ज्येष्ठ सदस्य असणे आवश्यक. (सदर व्यक्ती ही बँकेच्या व्यवस्थापनाची सदस्य नसावी.)

(ब) सदस्य – क्रियाशील सभासदांमधील २ तज्ज्ञ व्यक्ती ज्या अर्थशास्त्र/ सहकार/ बँकिंग या विषयामधील तज्ज्ञ आहेत, अकाउंटन्सी व ऑडिट, वकील या क्षेत्रातील व्यावसायिक अनुभव असलेल्या व्यक्ती.

सदर समितीची सभा किमान महिन्यातून एकदा होईल.

सदर समितीचे कर्तव्य म्हणजे त्यांच्या समोर आलेल्या वादामध्ये बँकेस योग्य तो सल्ला देण्याबरोबरच कायदा/नियम, बँकेचे उपविधी व रिझर्व्ह बँकेचे आणि सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्त्वे; तसेच बँकिंग आणि सहकार क्षेत्रातील रूढी यांचा विचार करून सभासद व संस्था यांच्यामध्ये तडजोड घडवून आणणे.

## ५१) मुख्य कार्यकारी अधिकारी, त्यांचे अधिकार व त्यांची कर्तव्ये :

रिझर्व्ह बँक व सहकार खाते यांनी वेळोवेळी प्रसिद्ध केलेल्या फिट अँड प्रॉपर क्रायटेरियानुसार संचालक मंडळ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणूक करेल. तो बँकेचा पूर्ण वेळ सेवक असून संचालक मंडळास त्यांच्या कामकाजात वेळोवेळी मदत करेल. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाचा पदसिद्ध सभासद राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळाच्या नियंत्रणाखाली राहील, तसेच संचालक मंडळाच्या मार्गदर्शनानुसार तो आपले पुढील अधिकार व कर्तव्ये पार पाडेल –

(१) बँकेच्या दैनंदिन व्यवस्थापनावर लक्ष ठेवणे.

(२) बँकेच्या वतीने बँकेची खाती चालविणे, तसेच रोखतेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची सुविधा उपलब्ध करणे.

(३) बँकेच्या वतीने आवश्यक त्या सर्व कागदपत्रांवर व पत्रांवर सह्या करणे.

(४) बँकेच्या वतीने आवश्यक ती सर्व हिशोबाची पुस्तके ठेवणे, आवश्यक ते सर्व रेकॉर्ड तयार ठेवणे; कायदा, नियम आणि उपविधींनुसार आवश्यक त्या ठिकाणी विहीत नमुन्यातील विवरण पत्रके दाखल करणे यासंबंधीची सर्व योजना करणे.

(५) अध्यक्षांच्या सूचनेनुसार सर्वसाधारण सभा, संचालक मंडळ सभा बोलावणे, कार्यकारी समिती व उपसमित्यांच्या सभा बोलावणे आणि सदर सभांचे इतिवृत्त तयार करणे.

(६) संचालक मंडळाच्या संमतीने बँकेतील विविध जागांकरिता नेमणुका करणे.

(७) बँकेची उद्दिष्टे, विविध धोरणे, तसेच भविष्यकाळासंबंधी नियोजन करण्याकरिता संचालक मंडळास मदत करणे.

(८) संचालक मंडळास वेळोवेळी आवश्यक ती माहिती देणे. तसेच बँकेच्या कामकाजाविषयी रिझर्व्ह बँकेने दिलेल्या कॅलेन्डर ऑफ रिव्ह्यूप्रमाणे वेळोवेळी माहिती देणे व रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक निरीक्षणासंबंधी माहिती देणे.

(९) संचालक मंडळाच्या सभेमध्ये ठेवण्यात येणाऱ्या प्रत्येक विषयाबाबत स्वतःचे स्पष्ट मत, सूचना आणि सल्ला देणे.

(१०) बँकेच्या वतीने न्यायालयीन प्रक्रियेसाठी वकिलांची नेमणूक करणे.

(११) आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० दिवसांमध्ये वार्षिक अहवाल, हिशोबाची परिपत्रके संचालक मंडळाच्या संमतीसाठी तयार करणे.

(१२) संचालक मंडळाने प्रदान केलेले व पोटनियमांनुसार प्राप्त झालेल्या अधिकारानुसार बँकेच्या कामकाजातील कर्तव्ये पार पाडणे.

(१३) मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतःला आवश्यक वाटतील असे काही अधिकार बँकेतील इतर अधिकाऱ्यांना बँकेच्या संचालक मंडळाच्या पूर्वपरवानगीने प्रदान करू शकतील.

(१४) मुख्य कार्यकारी अधिकारी बँकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये उपस्थित असणाऱ्या सभासदांच्या उपस्थितीचे सर्व रेकॉर्ड तयार करून स्वत:च्या कस्टडीमध्ये ठेवतील.

(१५) सर्वसाधारण सभा झाल्यानंतर १ महिन्याच्या आत उपस्थित सभासदांची यादी निबंधकांकडे पाठविण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर राहील. तसेच सदर यादी सर्व शाखा व रजिस्टर्ड ऑफिसच्या नोटीस बोर्डवर प्रदर्शित करतील.

## ५२) ठेवी :

(१) बँकेस सहकार कायदा व नियम, तसेच रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार आणि संचालक मंडळाच्या मंजुरीने त्या-त्या वेळच्या निर्णयानुसार वेगवेगळ्या व्याजदराने ठेवी स्वीकारता येतील.

(२) अशा ठेवी या चालू खाती, बचत खाती, रिकरिंग खाती, पुनर्गुंतवणूक खाती अथवा एखाद्या विशिष्ट योजनेनुसार येणारी खाती इत्यादी प्रकारांत स्वीकारता येतील. परंतु अशी खाती स्वीकारताना के.वाय.सी. नियमावलीचे पालन करणे आवश्यक आहे.

(३) बँकेच्या सर्व ठेवी विमा महामंडळ कायदा १९६१ नुसार सुरक्षित असतील आणि विमा महामंडळ कायद्यातील विविध तरतुदींनुसार त्या नियंत्रित केल्या जातील.

(४) अशी खाती उघडण्यासाठी व ती नियंत्रित करण्यासाठी बँकेस या संदर्भात रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या सूचना, मार्गदर्शक तत्त्वे आणि आदेश यांचे पालन करणे आवश्यक आहे.

## ५३) कर्जव्यवहार :

(१) सभासदांना खाली निर्देशित केल्याप्रमाणे विनातारण किंवा तारणापोटी अथवा संचालक मंडळाने मान्य केलेल्या इतर तारणांपोटी कर्ज, कॅशक्रेडिट्स व ओव्हरड्राफ्ट्स मंजूर करता येतील. मात्र याबाबत रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी येणाऱ्या कर्ज व्यवहाराबाबतच्या आदेशाचे पालन करावे लागेल.

(अ) व्यक्तिगत जामीनकी किंवा इतर सभासदांची जामीनकी/नाममात्र सभासदांची जामीनकी.

(ब) स्थावर मालमत्तेचे तारण/सहतारण.

(क) औद्योगिक माल, व्यापारी माल, शेतीमाल किंवा इतर बाजार-मूल्य असलेल्या वस्तू, मशिनरी यांच्यावर ताबे गहाण, नजर गहाण व इतर प्रकारे बोजा निर्माण करून.

(ड) सरकारी कर्जरोखे, विश्वस्त संस्थांचे पात्र कर्जरोखे, मान्यताप्राप्त कंपनीचे भाग, डिबेंचर्स व बँकेच्या मुदत ठेवी यांच्या तारणावर

(इ) विमा पॉलिसीचे तारणावर. (सरेंडर व्हॅल्यूपोटी)

(फ) वखार पावतीचे तारणावर.

(ग) सोने व चांदीच्या दागिन्यांच्या तारणापोटी.

(ह) कोणत्याही इतर दृश्य तारणापोटी. उदा. वाहने

(ई) रिझर्व्ह बँकेकडून वेळोवेळी आलेल्या परिपत्रकांमध्ये नमूद केलेल्या अन्य तारणावर.

(२) मुदत ठेवीच्या तारणापोटी बिगर सभासदास कर्ज/उचल मंजूर करणे.

(३) रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार नाममात्र सभासदांना कर्ज मंजूर करणे.

(४) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व निबंधक यांनी वेळोवेळी ठरविलेल्या नियमानुसार संचालक मंडळाने कर्ज मंजुरीबाबत योग्य तो दुरावा, विनातारण कर्जाचे प्रमाण, कर्जाच्या अटी व नियम (कारणानुसार व तारणानुसार) योग्य ते धोरण व नियम ठरविणे आवश्यक आहे.

(५) संचालक मंडळ सभा/कर्ज उपसमिती सभा यांना कर्ज अर्जातील अटी व शर्तिंनुसार ते मंजूर करण्याचे अधिकार असतील अथवा कुठलेही कारण न देता सदर कर्ज अर्ज नामंजूर करण्याचे अधिकार असतील. संचालक मंडळ सदस्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्ज अर्जावर दिलेल्या शेऱ्यानुसारच कर्ज मंजुरीबाबत किंवा नामंजुरीबाबत योग्य तो निर्णय घेता येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस नसलेल्या कर्जांना मंजुरी देताना संचालक मंडळ त्याबाबत कारणे नोंदवेल.

(६) सर्व प्रकारची कर्जे देताना रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी काढलेल्या आदेशांचे पालन होईल, हे पाहणे आवश्यक आहे.

## ५४) बँकिंग व्यतिरिक्त होणाऱ्या जास्तीत जास्त खर्चाची मर्यादा :

(१) संचालक व त्यांच्या कुटुंबीयांच्या संबंधित संस्था व फर्मला बँकेस कोणत्याही प्रकारची देणगी किंवा जाहिरात देता येणार नाही.

(२) बँक त्रयस्थ संस्थांना प्रायोजक म्हणून जाहिरात देऊ शकणार नाही.

(३) कोणत्याही सामाजिक कार्यासाठी खर्च करत असताना बँक सामाजिक बांधिलकीचा निधी उभारून त्याबाबतचे स्वतंत्र नियम तयार करून खर्च करू शकेल.

(४) मागील वर्षाच्या जाहीर निव्वळ नफ्याच्या १ टक्क्यापर्यंतची रक्कम या देणग्या किंवा सामाजिक कार्यासाठी खर्च करता येईल.

## ५५) नफ्याची वाटणी :

सहकारी संस्था कायदा व नियम यांस अनुसरून बँकेचा निव्वळ नफा काढला जाईल व त्याची वाटणी केली जाईल.

(१) संचालक मंडळाचे शिफारसीनुसार निव्वळ नफ्याची वाटणी सर्वसाधारण सभेत खालीलप्रमाणे करण्यात येईल –

(अ) सहकारी संस्था कायद्याच्या तरतुदीनुसार २५ टक्क्यांपेक्षा कमी नाही इतका नफा वैधानिक राखीव निधीत जमा केला जाईल.

(ब) वर कलम अ मधील तरतुदींव्यतिरिक्त कमीत कमी १० टक्के जादा निधी वैधानिक राखीव निधीत, नफा शिल्लक असेल तर भविष्यातील अनपेक्षित तोट्यांसाठी वर्ग करावा.

(२) उर्वरित निव्वळ नफ्याची विभागणी खालीलपैकी एका कारणासाठी किंवा सर्व कारणांसाठी संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीनुसार करता येईल.

(अ) वार्षिक साधारण सभेने ठरविल्यानुसार आणि कायदा व नियमानुसार सभासदांना लाभांश देण्यासाठी नफ्यातील रक्कम वर्ग करणे.

(ब) मागील निवडणुकीच्या खर्चाच्या १/५ रक्कम निवडणूक निधी म्हणून करता येईल.

(क) संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार शैक्षणिक निधी म्हणून कमीत कमी ५ टक्के किंवा जास्तीत जास्त १० टक्क्यांपर्यंत रक्कम सभासद, संचालक व सेवक यांच्या प्रशिक्षणासाठी वर्ग करता येईल.

(ड) रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार गुंतवणूक चढ–उतार निधीकरिता आवश्यक ती रक्कम वर्ग करावी.

(इ) संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार उर्वरीत नफ्याच्या १० टक्क्यांपर्यंत रक्कम तंत्रज्ञान विकास निधी म्हणून वर्ग करता येईल.

(फ) शिल्लक राहिलेला निव्वळ नफा इमारत निधीस वर्ग करता येईल.

## ५६) भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण :

कर्जदार सभासदासाठी भाग भांडवलाचे कर्जाशी प्रमाण पुढील प्रमाणात राहील.

(१) विनातारणी कर्जासाठी कर्ज रक्कमेच्या ५ टक्क्यांपर्यंत.

(२) तारणी कर्जासाठी कर्ज रक्कमेच्या २.५ टक्क्यांपर्यंत.

(३) लघु उद्योगधंद्यासाठी एकूण २.५ टक्क्यांपैकी सुरुवातीस कर्ज रकमेच्या १ टक्क्यापर्यंत व उर्वरित १.५ टक्का पुढील दोन वर्षांत घेता येईल.

तथापि, रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी यामध्ये बदल केल्यास ते कर्जदारावर बंधनकारक राहतील.

तथापि, भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण १२ टक्क्यांपेक्षा जास्त राहिल्यास रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तारणी कर्जाच्या बाबतीत हे प्रमाण बँक बदलू शकेल.

## ५७) निधीची गुंतवणूक :

बँक निधीची गुंतवणूक खालीलप्रमाणे करू शकेल –

(१) सहकारी बँक, राज्य सहकारी बँक, केंद्रीय सहकारी बँक, अन्य कोणतीही बँक किंवा

(२) इंडियन ट्रस्ट ॲक्टच्या सेक्शन २० मध्ये नमूद केलेल्या कर्जरोख्यांमध्ये किंवा

(३) दुय्यम संस्था किंवा इतर संस्था यांच्या भागांमध्ये किंवा त्यांच्या मालमत्तेमध्ये किंवा

(४) रिझर्व्ह बँकेने निर्देशित/मान्यता दिलेल्या कोणत्याही इतर प्रकारामध्ये.

स्पष्टीकरण : बँक म्हणजे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ नुसार निश्चित केलेल्या बँकिंग कंपनी ज्यामध्ये–

- स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा १९५५ नुसार स्थापित झालेली स्टेट बँक ऑफ इंडिया व त्या कायद्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार.
- स्टेट बँक ऑफ इंडिया (संलग्न बँक) कायदा १९५९ नुसार कोणतीही संलग्न बँक व या कायद्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार.
- राष्ट्रीयीकृत बँक किंवा व्यापारी बँक.

- बँकिंग कंपनी (ॲक्विझिशन अँण्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंग कायदा १९७०) किंवा बँकिंग कंपनी (ॲक्विझिशन ॲण्ड ट्रान्सफर ऑफ अंडरटेकिंग कायदा १९८०) यानुसार कोणतीही स्थापित केलेली नवी बँक व सदर कायद्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार.
- कोणतीही शेड्युल्ड/आंतरराज्य शेड्युल्ड सहकारी बँक - जी मागील ३ वर्षांपासून सतत नफ्यामध्ये आहे व जिचा लेखापरीक्षण वर्ग 'अ' आहे.

## ५८) राखीव निधी :

(१) सहकारी कायदा नियम व पोटनियम यांत नमूद केलेल्या रकमेशिवाय राखीव निधीत प्रवेश फी, नाममात्र सभासद फी, भाग वर्ग करण्याची फी, जप्त केलेल्या भागांची रक्कम, जप्त केलेल्या लाभांशाची रक्कम व देणग्या या रकमा जमा करता येतील.

(२) राखीव निधीची गुंतवणूक कायदा व नियमानुसार करता येईल.

(३) राखीव निधीची रक्कम निबंधकाच्या पूर्वपरवानगीने व महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व त्याचे नियम यानुसार कोणत्याही प्रकारची मालमत्ता खरेदी करण्यासाठी वापरू शकेल.

## ५९) लाभांश :

(१) जाहीर केल्यानुसार लाभांशाची रक्कम ती ज्या सहकारी वर्षाशी संबंधित असेल, त्या वर्षाच्या शेवटच्या दिवशी सदरहू भाग ज्याचे नावाने बँकेचे पुस्तकात असतील त्यास देण्यात येईल.

(२) भागधारकांची रक्कम जितके महिने असेल त्याप्रमाणात तसेच भागांच्या प्रमाणात कटमितीने लाभांश दिला जाईल.

(३) लाभांशाची रक्कम बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये मिळू शकेल.

(४) लाभांश जाहीर केल्यानंतर ३ वर्षे न घेतलेल्या लाभांशाची रक्कम जप्त करून राखीव निधीत जमा केली जाईल.

(५) मागील वर्षी भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जाहीर केलेल्या किमान प्रमाणापेक्षा जास्त असेल, तर जास्तीत जास्त १५ टक्क्यांपर्यंत लाभांश देता येईल.

## ६०) हिशोब, नोंदी व लेखापरीक्षण :

(१) बँकेतील व्यवहाराबद्दलचे दप्तर व हिशोब मे. निबंधक, सहकारी संस्था व रिझर्व्ह बँक यांनी ठरवून दिलेल्या व मान्य केलेल्या नमुन्यात ठेवले जातील. बँकेचा कोणताही सभासद त्याचे संबंधित व्यवहाराविषयी हिशोब व रजिस्टर्स बँकेच्या कामकाजाच्या वेळात पूर्वसूचनेनुसार वेळ ठरवून पाहू शकेल.

(२) मा. निबंधक यांनी मान्यता दिलेल्या लेखापरीक्षकांच्या यादीतील किंवा स्वत: बँकेने मान्यता दिलेल्या लेखापरिक्षकांच्या यादीतील लेखापरीक्षकाकडून बँकेच्या हिशोबांचे लेखापरीक्षण प्रत्येक आर्थिक वर्षात किमान एकदा करण्यात येईल. सदर लेखापरीक्षणाचे मानधन ठरविण्याचा अधिकार मा. निबंधक यांना किंवा बँकेस राहील.

(३) सदरच्या लेखापरीक्षकांची नेमणूक व त्याकरिताचे मानधन हे वार्षिक साधारण सभेत ठरविले जाईल.

**६१) बँकेची मोहर (सील) :**

बँकेची मोहर (सील) तयार करण्यात येईल व ते मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या ताब्यात राहील. सदरहू मोहर (सील) संचालक मंडळाचे ठरावाप्रमाणे एक संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष वापरली जाईल.

**६२) पोटनियमाची दुरुस्ती :**

(१) पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल करण्यासाठी किमान १४ दिवसांची पूर्वसूचना सभासदांना देणे आवश्यक आहे.

(२) पोटनियमातील कोणत्याही कलमामध्ये बदल, दुरुस्ती, वाढ अगर रद्द करण्यासाठी सभेमध्ये एकूण हजर व मतदान करणाऱ्या २/३ सभासदांचे बहुमत आवश्यक राहील. त्याशिवाय कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही.

(३) उपरोक्त मंजूर झालेल्या पोटनियमांची अंमलबजावणी निबंधकांची लेखी मंजुरी आलेल्या तारखेपासून होईल.

**६३) सभासदांसाठी शैक्षणिक वर्ग :**

बँक वेळोवेळी सभासदांसाठी; तसेच संचालकांसाठी, कर्मचाऱ्यांसाठी सहकारी प्रशिक्षण राज्यसंघीय संस्थामार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थेमार्फत, तसेच बँकेच्या प्रशिक्षण केंद्रामार्फत वर्ग आयोजित करेल व त्यासाठी आवश्यक असणारा निधी आणि सुविधा उपलब्ध करून देईल.

## ६४) भविष्यनिर्वाह निधी :

भविष्यनिर्वाह निधी कायदा १९५२ नुसार बँक भविष्यनिर्वाह निधीसाठी कर्मचाऱ्यांच्या पगारातून किमान कपात होणाऱ्या भविष्यनिर्वाह निधीइतकीच रक्कम वर्गणी निधी म्हणून जमा करेल अथवा बँकेचा हिस्सा म्हणून भविष्यनिर्वाह निधी खात्याकडे पाठवेल.

## ६५) सेवाशर्ती :

सेवकांसाठीच्या सेवाशर्ती व नियंत्रणासाठी सर्व्हिस रूल्स संचालक मंडळ तयार करेल व त्यामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार दुरुस्त्या करेल.

## ६६) समारोप करणे :

जर बँकेचा कारभार गुंडाळणे आवश्यक असेल, तर सदरची प्रक्रिया ही कायदा व नियम यांतील तरतुदिंनुसार राहील.

## ६७) व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत कर्मचाऱ्यांचा सहभाग :

प्रशासकीय सूचनेद्वारे कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीच्या संबंधित व्यवस्थापनाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये कर्मचाऱ्यांचा सहभाग असण्याच्या दृष्टीने योग्य ते नियम बँक करू शकते.

## ६८) इतर :

(१) बँकेस महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासद होता येईल. याशिवाय बँक खालील संस्थांची वर्गणीदार सभासद होऊ शकेल –

- (अ) नागरी सहकारी बँकांचे राज्यस्तरावरील फेडरेशन.
- (ब) नागरी सहकारी बँकांचे राज्यस्तरावरील असोसिएशन.
- (क) प्रादेशिक/जिल्हास्तरावरील नागरी सहकारी बँकांचे असोसिएशन.
- (ड) महाराष्ट्र राज्य सहकारी संघ/जिल्हा सहकारी बोर्ड.
- (इ) इंडियन इन्स्टिटयूट ऑफ बँकर्स अ‍ॅण्ड फायनान्स.
- (फ) इंडियन बँक्स् असोसिएशन.
- (ग) राष्ट्रीय सहकारी युनियन.
- (ह) नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को–ऑप. बँक्स् अ‍ॅण्ड क्रेडिट सोसायटीज्.
- (ई) बँकिंग सेक्टरशी संबंधित असणारे कोणतेही फेडरेशन/ असोसिएशन /संघ / बोर्ड.

(२) बँकेच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये राहिलेला दोष अथवा संचालक मंडळातील रिकामी जागा न भरणे वगैरे कारणांसाठी वार्षिक सर्वसाधारण सभा अथवा संचालक मंडळ सभांमधील कोणताही निर्णय बेकायदा ठरणार नाहीत.

(अ) बँकेच्या पोटनियमांतील एखाद्या पोटनियमाच्या अर्थाबाबत शंका निर्माण झाल्यास सदरची शंका निरसनासाठी मा. निबंधक यांचा सल्ला घेण्यात यावा व त्यांनी याबाबत दिलेला निर्णय हा अंतिम राहील.

(ब) डिक्री, ऑर्डर्स, निर्णय याबाबत कार्यवाही करताना कायद्यातील सर्व तरतुदींचे पालन करावे.

(क) वरिष्ठ पातळीवरील अपील व संबंधित केसची पुनर्वालोकन याचिका या कायदेशीर तरतुदींनुसार असाव्यात.

(ड) गुन्हा व दंड याबाबतची कार्यवाही कायद्यातील तरतुदींनुसार करावी.

(इ) निबंधकांकडे माहिती सादर करताना कायद्यातील तरतुदींचे पालन करावे.

(फ) वरीलबाबत पोटनियमांमध्ये एखादी तरतूद नसल्यास अशा वेळी कायदा व नियमांतील तरतुदींनुसार निर्णय प्रक्रिया पार पाडावी.

**ठराव क्र.१(अ)**

**मंजूर: सदरचे पोटनियमांस दिनांक २०.०४.२०१३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मंजूरी दिलेली आहे.**

*****

**विशेष सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०.०४.२०१३, झालेल्या विषेश सर्वसाधारण सभेत, मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या खालील पोटनियम संदर्भात विशेष सर्वसाधारण सभेने सुचविलेली शब्दरचना/बदल**

| पान क्र. | पोटनियम क्र | संदर्भ | संचालक मंडळाने शिफारस केलेली शब्दरचना | विशेष सर्वसाधारण सभेने सुचविलेल्या बदलानंतर झालेली शब्दरचना | विशेष सर्व साधारण सभेने सुचविलेल्या दुरुस्तीची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १२(२)(अ) | सभासदाचे हक्क व अधिकार | अगोदरच्या सलग पाच वर्षांतील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे. | सदर शब्दरचना रद्द करावी. | बँकेस व्यवसायकरणेसाठी संपूर्ण महाराष्ट्राची परवानगी मिळालेली असुन बँक त्या दृष्टीने व्यवसायवाढीसाठी कार्यरत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील इतर ठिकाणाहून बँकेच्या सभासदांस पुण्यामध्ये सर्वसाधारणसभेस उपस्थित रहाणे शक्य होईल असे वाटत नसल्याने व सभासद संख्या जास्त आणि विखुरलेली असल्याने सर्व सभासदांना ५ वर्षातुन किमान एकदा सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाणे शक्य नसल्याने. सभासदांना कायद्यातील सदरची तरतुद जाचक वाटत असल्याने मान्य नाही. |
| ९ | १२(२)(ब) | सभासदाचे हक्क व अधिकार | अगोदरच्या सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेणे.<br>जो सभासद अगोदरच्या सलग पाच वर्षांतील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहिला नसेल आणि अगोदरच्या | **पोट नियम क्र. १२ (२) :**<br>सभासद झालेल्या दिनांकापासुन पुढील सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेणे.<br>सभासद झालेल्या दिनांकापासुन पुढील | अधिक स्पष्टता येणे आवश्यक असल्याने तसेच पोटनियम क्र. १२(२)(अ) ची तरतुद मान्य नसल्याने सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ ज्याने घेतला नसेल, अशा सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकरण केल्याबाबतचे पत्र असे आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० दिवसांचे आत बँकेतर्फे पाठविण्यात येईल.<br>जो अक्रियाशील सभासद सलग पाच वर्षांतील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणार नाही आणि नंतरच्या पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेणार नाही, त्याला कायद्याचे कलम ३५ नुसार बँक निष्कासित करू शकेल.<br>ज्या सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून संबोधले जाईल, त्याला परत क्रियाशील सभासद होईपर्यंत बँकेच्या कोणत्याही सवलतीचा लाभ मिळणार नाही.<br>सभासद क्रियाशील आहे अथवा अक्रियाशील आहे, यामध्ये मतभेद झाल्यास याबाबतचे अपिल निबंधकांकडे अशी सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत करता येईल.<br>कायद्यामधील सदर दुरुस्ती प्रसिद्ध झाल्यानंतर लगेचच ज्या बँकांची निवडणूक होणार आहे, अशा बँकांच्या सर्व | सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ ज्याने घेतला नसेल, अशा सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकरण केल्याबाबतचे पत्र असे आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० दिवसांचे आत बँकेतर्फे पाठविण्यात येईल. त्यानंतरच्या पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियमांमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेणार नाही, त्याला कायद्याचे कलम ३५ नुसार बँक निष्कासित करू शकेल.<br>ज्या सभासदास अक्रियाशील सभासद म्हणून संबोधले जाईल, त्याला परत क्रियाशील सभासद होईपर्यंत बँकेच्या क्रियाशील सभासदांस उपलब्ध कोणत्याही सवलतीचा लाभ मिळणार नाही.<br>सभासद क्रियाशील आहे अथवा अक्रियाशील आहे, यामध्ये मतभेद झाल्यास याबाबतचे अपिल निबंधकांकडे अशी सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत करता येईल.<br>कायद्यामधील सदर दुरुस्ती प्रसिद्ध झाल्यानंतर लगेचच ज्या बँकांची निवडणूक होणार आहे, अशा बँकांच्या सर्व सभासदांना जोपर्यंत ते अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकृत केले | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सभासदांना जोपर्यंत ते अक्रियाशील सभासद म्हणून वर्गीकृत केले जात नाहीत तोपर्यंत त्या सभासदास मतदानाचा अधिकार राहील. | जात नाहीत तोपर्यंत त्या सभासदास मतदानाचा अधिकार राहील. | |
| १० | १४ (अ) | क्रियाशील सभासद | जो सभासद अगोदरच्या सलग पाच वर्षांतील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहिला आहे. | सदर शब्दरचना रद्द करावी. | पोटनियम क्र. १२(२)(अ) ची तरतुद मान्य नसल्याने सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |
| १० | १४ (ब) | क्रियाशील सभासद | ज्या सभासदाने अगोदरच्या सभासद झालेल्या दिनांकापासुन पुढील सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियम १५(२) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेतला आहे. | **पोट नियम क्र. १४ :**<br>ज्या सभासदाने सभासद झालेल्या दिनांकापासुन पुढील सलग पाच वर्षांमध्ये बँकेच्या पोटनियम १५(२) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे बँकेच्या सेवांचा लाभ घेतला आहे. | अधिक स्पष्टता येणे आवश्यक असल्याने सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |
| १२ | २० | सभासदांची जबाबदारी | सभासदांनी घेतलेल्या भागांच्या रकमेइतकीच त्याची जबाबदारी मर्यादित राहील. माजी सभासदांची जबाबदारी ज्या वेळी त्यांचे सभासदत्व रद्द झाले त्या वेळेपासून दोन वर्षांपर्यंत राहील. तसेच मयत सभासदाच्या मालमत्तेवर त्याच्या जबाबदारीपोटी दोन वर्षांपर्यंत बोजा राहील. | सभासदांनी घेतलेल्या भागांच्या रकमेइतकीच त्याची जबाबदारी मर्यादित राहील. | सभासदत्व रद्द झालेल्या दिनांकापासुन माजी सभासदांना जबाबदार धरु नये अशी सभेची मागणी असल्याने सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |
| १५ | २८ (१) | माजी सभासदांची जबाबदारी व मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता | माजी सभासदांची जबाबदारी अथवा मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता बँकेस येणे असलेल्या रकमेपोटी पुढीलप्रमाणे राहील.<br>(अ) माजी सभासदांच्या बाबतीत ज्या दिवशी त्याचे सभासदत्व संपुष्टात आले, त्या दिनांकापासून दोन वर्षे.<br>(ब) मृत्यू पावलेल्या सभासदाचे बाबतीत त्याचा मृत्यूच्या दिनांकापासून पुढे दोन वर्षांकरिता. | सदर शब्दरचना रद्द करावी. | पोटनियम क्र. २० ची तरतुद मान्य नसल्याने सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २८ (२) | माजी सभासदांची जबाबदारी व मृत्यू पावलेल्या सभासदांची मालमत्ता | ज्या वेळी कायद्यानुसार बँकेस बँकिंग व्यवसाय गुंडाळण्याचा आदेश मिळेल, त्या वेळी माजी सभासदांची जबाबदारी व आदेशाचे तारखेपूर्वी दोन वर्षांचे आत मृत्यू पावलेल्या सभासदाची मालमत्ता अवसायनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहील. परंतु सभासदाची जबाबदारी ही त्याचे सभासदत्व संपुष्टात येण्याच्या दिवशीची व मृत्यू पावलेल्या सभासदाच्या मृत्यूच्या दिनांकाचे वेळी असलेली राहील. | **पोट नियम क्र. २८:**<br>ज्या वेळी कायद्यानुसार बँकेस बँकिंग व्यवसाय गुंडाळण्याचा आदेश मिळेल, त्या वेळी माजी सभासदांची जबाबदारी व आदेशाचे तारखेपूर्वी दोन वर्षांचे आत मृत्यू पावलेल्या सभासदाची मालमत्ता अवसायनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चालू राहील. परंतु सभासदाची जबाबदारी ही त्याचे सभासदत्व संपुष्टात येण्याच्या दिवशीची व मृत्यू पावलेल्या सभासदाच्या मृत्यूच्या दिनांकाचे वेळी त्याच्या भाग भांडवलाइतकीच मर्यादित राहील. | अधिक स्पष्टता येणे आवश्यक असल्याने सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |
| १६ | ३० | भाग वर्ग करणेबाबत | **शिर्षक – भाग वर्ग करणेबाबत :** | **शिर्षक – भाग वर्ग अथवा भाग रक्कम अशंत: परत करणेबाबत :**<br>अ) सभासद स्वत:चे नावावरील आवश्यक भाग रक्कम ठेवून संचालक मंडळाचे संमतीने अंशत: परत घेऊ शकेल.<br>**(शिर्षक बदलण्यात आले व वरिल मुद्दा नव्याने समाविष्ट करण्यात आला.)** | एका सभासदाचे कमाल भाग भांडवल रु. ५.०० लक्ष असल्याने, सभासदांच्या मागणी नुसार किमान भाग भांडवल ठेवुन, उर्वरीत भाग रक्कम सभासदांना देता येणे शक्य व्हावे याकरिता सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |
| १८ | ३४ (३) | वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभेची सूचना | सर्वसाधारण सभेच्या नोटीसबरोबर उपस्थितीबाबतचे सही न केलेले सर्टिफिकेट पाठविले जाईल. सदर सर्टिफिकेटमध्ये वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळी बँकेने नेमलेले अधिकृत अधिकारी सही करतील व असे सर्टिफिकेट उपस्थितीबाबतचा निर्णायक पुरावा असेल. | सदर शब्दरचना रद्द करावी. | पोटनियम क्र. १२(२)(अ) ची तरतुद मान्य नसल्याने सदरची दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. |